औरंगाबाद, नागपूर, पुणे, अमरावती, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, जळगांव, रत्नागीरी, ठाणे, पालघर, नंदुरबार, नांदेड, चंद्रपूर, गडचिरोली, अहमदनगर, सातारा या विभागातून एकाच वेळी प्रकाशीत होणारे वृत्तपत्र

माहिती खात्रीची व प्रगतीची, देतो वेध भविष्याचा..

# नौकरी एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर

पाने : ८

किंमत : १५.००

वर्ष : १५ वे

अंक : ४३ वा

रविवार - १५ ते २१ जून २०२५

Marathi-Weekly

RNI.No.MAH/MAR2010/34125

E-mail:naukriexpress.impact@gmail.com

E-Paper : http://naukriexpress.co.in

Post Regd.No. G 2/RNP/AGD-415/2024-26

किंमत १७/-

- १५ हजार हाय-टेक नोकऱ्यांची निर्मिती शक्य-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

-पदवीधर आणि इंजिनिअर्ससाठी नौकरीची सुवर्णसंधी

-साधना नायर बनल्या मेडिकल सर्व्हिसेसच्या पहिल्या महिला डीजी

-नीट आणि पीजी १५ जूनला होणारी परीक्षा रद्द

-पीसीएम आणि पीसीबी गटाच्या एमएचटी सीईटी परीक्षेत २८ सत्रांमधील ४० प्रश्न चुकीचे

सविस्तर वृत्त पान ८ वर पहा..

-ब्रह्मोस क्षेपणास्त्र कोण डागते, स्पेशल कमांड युनिट भारताचे 'ब्रह्मास्त्र' कसे लाँच करते?

-SSC भरती देण्यासाठी कोणती माहिती असणार वैध, आयोगाने केले स्पष्ट

-राज्यसभेची निवडणूक प्रक्रिया नेमकी कशी असते?

-राफेल विमानं आता भारत स्वत: बनवणार

सविस्तर वृत्त पान ४ वर पहा..

-पहिलीपासून विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षणाचे धडे-शिक्षणमंत्री भुसे

-वसतीगृह प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

-यूपीएससी परीक्षेत सामान्य ज्ञान (GK) आणि सामान्य अध्ययन (GS) च्या तयारीचे महत्त्व

-स्पेशल कमांड युनिट भारताचे 'ब्रह्मास्त्र' कसे लाँच करते?

सविस्तर वृत्त पान ३ वर पहा..

-खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑनलाईन प्रवेश

'-आयटीआय'चे अभियांत्रिकी ट्रेड्स सर्वोत्तम पर्याय

-हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग; महाराष्ट्राची भाग्यरेषा

-नीट युजी परीक्षेचा निकाल जाहीर

सविस्तर वृत्त पान २ वर पहा..

-तुम्हाला पर्यटन आणि आतिथ्य क्षेत्रात करिअर करायचे आहे?

-अभियांत्रिकी परीक्षेत गैरप्रकार

-कशा प्रकारे होते RAW मध्ये भरती?

-AAICLAS ने ३१३ पदांसाठी जाहीर केली भरती

- मेडिकल आणि IIT विद्यार्थ्यांसाठी मोफत कोचिंग

-RRB , NTPC परीक्षेत विचारले जातील २२० प्रश्न, -कसा असणार परीक्षा नमुना?

सविस्तर वृत्त पान ७ वर पहा..

## .... निघणार इतर भरती

# SSC CGL, MTS आणि CHSL, दिल्ली पोलिस SI यासह ७ मोठ्या भरती

SSC म्हणजेच स्टाफ सिलेक्शन कमिशनने सिलेक्शन पोस्ट फेज-बारावी २०२५ भरतीची अधिसूचना जारी केली आहे. सोमवारपासून अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत २४०० हून अधिक रिक्त जागा जाहीर झाल्या आहेत.

कॅलेंडरनुसार, पुढील भरती स्टेनोग्राफरची असेल. स्टेनोग्राफर ग्रेड सी आणि डी परीक्षा २०२५ साठी अर्ज ५ ते २६ जून दरम्यान घेतले जातील आणि परीक्षा ६ ते ११ ऑगस्ट दरम्यान घेतली जाईल. आयोगाच्या सर्वात महत्त्वाच्या भरती परीक्षांपैकी एक असलेल्या कम्बाइंड ग्रॅज्युएट लेव्हल परीक्षा २०२५ टियर वन साठी अर्ज ९ जून ते ४ जुलै दरम्यान असतील आणि परीक्षा १३ ते ३० ऑगस्ट दरम्यान प्रस्तावित आहे.

त्याचप्रमाणे, सर्वात लोकप्रिय परीक्षेत, एसआय दिल्ली पोलिस आणि केंद्रीय सशस्त्र पोलिस दल परीक्षा २०२५ साठी अर्ज १६ जून ते ७ जुलै दरम्यान स्वीकारले जातील आणि ही परीक्षा १ ते ६ सप्टेंबर दरम्यान घेतली जाईल. दिल्ली पोलिसात एसआयच्या २१२ संभाव्य पदे आहेत.आणखी एका महत्त्वाच्या भरतीसाठी संयुक्त उच्च माध्यमिक पातळी परीक्षा २०२५ साठी, अर्ज २३ जून ते १८ जुलै दरम्यान खुले असतील आणि परीक्षा ८ ते १८ सप्टेंबर दरम्यान प्रस्तावित आहे.सर्वाधिक अर्ज केलेल्या भरतींपैकी एक म्हणजे मल्टी टास्किंग स्टाफ (नॉन-टेक्निकल) आणि हवालदार (केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळ आणि केंद्रीय नार्कोटिक्स ब्युरो) भरती २०२५. अर्ज २६ जून ते २४ जुलै दरम्यान स्वीकारले जातील आणि परीक्षा २० सप्टेंबर ते २४ ऑक्टोबर दरम्यान होण्याची शक्यता आहे.जूनियर इंजीनियर (स्थापत्य, यांत्रिकी, इलेक्ट्रिकल) परीक्षा, २०२५- ३० जून रोजी अधिसूचना, पेपर-१ परीक्षा २७ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान.



### जून नंतर निघणारे इतर भरती

दिल्ली पोलिस परीक्षा, २०२५ कॉन्स्टेबल (ड्रायव्हर) - जुलै-सप्टेंबर २०२५ मध्ये पुरुष अधिसूचना, नोव्हेंबर-डिसेंबर २०२५ मध्ये परीक्षा. दिल्ली पोलिसात ६३३ पदे शक्य आहेत.

दिल्ली पोलिस परीक्षा, २०२५ हेड कॉन्स्टेबल (मंत्रालय) अधिसूचना जुलै-सप्टेंबर २०२५ मध्ये, परीक्षा नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये. यामध्ये ४०४ पदे शक्य आहेत.

दिल्ली पोलिस परीक्षा, २०२५ मध्ये हेड कॉन्स्टेबल (असिस्टंट वायरलेस ऑपरेटर (AWO)/ टेली-प्रिंटर ऑपरेटर (TPO), जुलै-सप्टेंबर २०२५ मध्ये अधिसूचना, नोव्हेंबर-डिसेंबर २०२५ मध्ये परीक्षा

दिल्ली पोलिस परीक्षा, २०२५ मध्ये कॉन्स्टेबल (एक्झिक्युटिव्ह) पुरुष आणि महिला, जुलै-सप्टेंबर २०२५ मध्ये अधिसूचना, नोव्हेंबर-डिसेंबर २०२५ मध्ये परीक्षा. ५२९३ संभाव्य पदे आहेत.

केंद्रीय सशस्त्र पोलिस दल (CAPFs), NIA, SSF मध्ये कॉन्स्टेबल (GD) आणि आसाम रायफल्समध्ये रायफलमन (GD) परीक्षा, २०२६ मध्ये अधिसूचना, नोव्हेंबरमध्ये अधिसूचना, जानेवारी-फेब्रुवारी २०२६ मध्ये परीक्षा.

# राष्ट्रपतींची पहिली महिला ADC बनली नौदलाची यशस्वी सोलंकी



भारतीय नौदलाच्या लेफ्टनंट कमांडर यशस्वी सोलंकी यांची राष्ट्रपतींच्या सहाय्यक-दे-कॅम्प (ADC) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.. पहिल्यांदाच एका महिला नौदल अधिकाऱ्याला सर्वोच्च कमांडरच्या सहाय्यक-भारतीय नौदलाच्या लेफ्टनंट कमांडर यशस्वी सोलंकी यांची राष्ट्रपतींच्या सहाय्यक-दे-कॅम्प (ADC) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रपती हे सशस्त्र दलांचे सर्वोच्च कमांडर असतात. पहिल्यांदाच एका महिला नौदल अधिकाऱ्याला सर्वोच्च कमांडरच्या सहाय्यक-दे-कॅम्प पद देण्यात आले आहे. राष्ट्रपतींना ५ ADC दिले जातात. त्यापैकी ३ सैन्य दलातील, १ हवाई दलातील आणि १ नौदलातील असतात. यासाठी राष्ट्रपती स्वत: अधिकाऱ्यांची निवड करतात.

**एडीसीचे पद कोणाला भेटतं ?**

-..ते राष्ट्रपतींचे सर्वात जवळचे लष्करी सहाय्यक आहेत.

-..ते राष्ट्रपती आणि सशस्त्र दलांमध्ये संवाद स्थापित करतात.

-त्यांना कार्यक्रमांमध्ये राष्ट्रपतींच्या प्रोटोकॉलचे व्यवस्थापन करावे लागते.

-हा एका तरुण लष्करी अधिकाऱ्याला मिळू शकणारा सर्वात मोठा सन्मान आहे.

-केवळ उत्कृष्ट सेवा रेकॉर्ड असलेल्या अधिकाऱ्यांनाच ही संधी मिळते.

- त्यांची निवड नेतृत्व गुणवत्ता, सेवा रेकॉर्ड आणि ऑपरेशनल कामगिरीच्या आधारे केली जाते.

**यशश्वी मूळगांव हरियाणाची**

-यशस्वी सोलंकी ही मूळची हरियाणाची आहे. २०१२ मध्ये ती शॉर्ट सर्व्हिस कमिशन अंतर्गत नौदलाच्या लॉजिस्टिक्स शाखेत रुजू झाली. ५ ते ७ वर्षे येथे सेवा दिल्यानंतर आता तिला राष्ट्रपतींचे ADC बनवण्यात आले आहे.

-नौदलाच्या अधिकाऱ्यांच्या मते, यशस्वीची शिस्त, कठोर परिश्रम आणि नेतृत्वगुणांमुळे ती या पदावर पोहोचली आहे. आता तिची राष्ट्रपतींच्या ADC म्हणून नियुक्ती झाली आहे. असे करणाऱ्या त्या पहिल्या महिला आहेत.

-महिला गव्हर्नर, आर्मी कमांडर या एडीसी राहिल्या आहेत.

-२०२३ मध्ये स्क्वॉड्रन लीडर मनीषा पाधी यांना मिझोरमचे मुख्यमंत्री हरिबाबू कंभमबाटी यांच्या एडीसी करण्यात आले. त्या गव्हर्नरच्या एडीसी होणाऱ्या पहिल्या महिला होत्या. मनीषा २०१५ च्या बॅचच्या भारतीय हवाई दलाच्या अधिकारी आहेत.

-२०१९ च्या सुरुवातीला लेफ्टनंट गनिवे लालजी यांना आर्मी कमांडरचे एडीसी म्हणून नियुक्त करण्यात आले होते. आर्मी कमांडरचे एडीसी बनणाऱ्या त्या पहिल्या महिला होत्या. लालजी २०११ मध्ये कॉर्प्स ऑफ मिलिटरी इंटेलिजेंसमध्ये सामील झाल्या.

# जवाहर नवोदय विद्यालय मध्ये इयत्ता '६ वी' साठी प्रवेश प्रक्रिया सुरु

**नौकरी एक्सप्रेस छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी/** जवाहर नवोदय विद्यालय मध्ये इयत्ता ६ वी साठी अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. जर तुम्हाला जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेश घ्यायचा असेल तर ऑनलाइन अर्ज भरावा लागेल. या करीता पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन अर्ज दिनांक २९ जुलै २०२५ पर्यंत मागवित आहेत.जवाहर नवोदय विद्यालय (JNV) ने इयत्ता ६ वी मध्ये प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. ही अर्ज




प्रक्रिया इयत्ता ६ वी च्या २०२६ च्या बॅचमध्ये प्रवेशासाठी केली जात आहे. जर तुमच्या मुलाला किंवा मुलीला जवाहर नवोदय विद्यालयातून शिक्षण घ्यायचे असेल. तर आजच तुम्ही यांच्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊन अर्ज करा. चला जाणून घेऊया अर्ज कसा करायचा आणि अर्ज करायची शेवटची तारीख काय?

जर तुम्हाला जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेश घ्यायचा असेल तर..

**सविस्तर वृत्त पान २ वर..**

# आयटीआय प्रवेशासाठी सुधारित वेळापत्रक जाहीर

## अर्ज करणयासाठी २६ जूनपर्यंत मुदत

**नौकरी एक्सप्रेस मुंबई/ प्रतिनिधी/** व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने आयटीआय प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. विद्यार्थी २६ जूनपर्यंत ऑनलाइन अर्ज करू शकतील. पहिली गुणवत्ता यादी ९ जुलै रोजी प्रसिद्ध होणार आहे. राज्यात एकूण एक हजार सात आयटीआयमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. आतापर्यंत १.३९ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. प्रवेशाची अंतिम मुदत २६ जून असून



विद्यार्थ्यांनी आपले अर्ज वेळेत सादर करावे.राज्यातील आयटीआय प्रवेश प्रक्रियेला आता अधिक वेग मिळणार असून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने अखेर प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. यानुसार, विद्यार्थी २६ जूनपर्यंत ऑनलाइन अर्ज..

**सविस्तर वृत्त पान २ वर..**

# रोजगार संधी वाढवण्याच्या दिशेने राज्याची ठोस पावले - कामगार मंत्री आकाश फुंडकर

**नौकरी एक्सप्रेस मुंबई/ प्रतिनिधी/** एम्प्लॉयर्स फेडरेशन ऑफ इंडिया आणि भारतीय उद्योग परिसंघ यांच्या उपक्रमातून उद्योग आणि शासन यांच्यातील सहकार्याचे मूर्त स्वरूप दिसते. महाराष्ट्राने देशात औद्योगिक क्षेत्रात अग्रेसर असून, कामगार धोरणातील सुधारणा, डिजिटल प्लॅटफॉर्म्स, आणि रोजगार संधी वाढवण्याच्या दिशेने राज्याने ठोस पावले उचलली आहेत, असे प्रतिपादन कामगार मंत्री ड.आकाश फुंडकर यांनी केले.मुंबई येथे एम्प्लॉयर्स फेडरेशन ऑफ इंडिया आणि भारतीय उद्योग परिसंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित EFI वार्षिक व्यवसाय परिषद व कामगार संबंध उत्कृष्टता पुरस्कार २०२५ या कार्यक्रमातफुंडकर यांनी विचार मांडले. या कार्यक्रमाला एत्र्ख चे अध्यक्ष अरविंद गोयल, CII पश्चिम विभाग HRAIR पॅनेलचे अध्यक्ष डॉ. सी. जयकुमार, तसेच दत्तोपंत ठेंगडी राष्ट्रीय कामगार शिक्षण व विकास मंडळाचे अध्यक्ष विरजेश उपाध्याय आदी उपस्थित होते.

कामगार मंत्री फुंडकर म्हणाले की, केंद्र शासनाने २९ कामगार कायदे एकत्र करून चार व्यापक कोड तयार केले आहे. हे कायदे अधिक पारदर्शकता, सुसंगतता आणि कामगार हक्कांचे संरक्षण करतील. EFI - CII ने कामगार कायद्यांबाबत, रोजगार-प्रोत्साहन योजना (ELI), तसेच गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांच्या सहभागासाठी धोरण निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

महाराष्ट्रासह देशभरात डिजिटल व्यासपीठांमुळे रोजगार जुळवणी, सल्ला, कौशल्य विकास सुलभ झाला आहे. CII ने पुढील ५ वर्षांत १०० नवीन चउउी उभारण्याचा मानस व्यक्त केला असून हे नक्कीच उल्लेखनीय आहे.

देशातील ३०.६८ कोटी असंघटित कामगार नोंदणीकृत असून, त्यात



महाराष्ट्रातील १.७३ कोटी कामगारांचा समावेश आहे. या माध्यमातून सामाजिक संरक्षणाचा फायदा असंघटित क्षेत्रात पोहोचवला जात आहे. शिक्षण आणि रोजगार यामधील दरी भरून काढण्यासाठी CII व कामगार मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने ई२ई लाउंज सुरू करण्यात आले आहेत. येथे करिअर मार्गदर्शन, कौशल्य प्रशिक्षण व नोकरी संधी दिल्या जात आहेत. महिलांपासून दिव्यांग, युवा, वंचित घटकांचा समावेश आणि समान संधी देणे हे केवळ नैतिक कर्तव्य नाही, तर आर्थिक स्थिरतेचेही मूळ असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कर्मचारी संबंध म्हणजे केवळ वाद निवारण नव्हे, तर कर्मचारी हे संस्थेची संपत्ती मानून त्यांच्या सक्षमीकरणाचा विचार करणे होय, असेही फुंडकर यांनी नमूद केले.कामगार मंत्री फुंडकर यांनी पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, नेतृत्वगुण आणि मूल्याधारित कामकाजाची पद्धत हा उद्योग क्षेत्रासाठी प्रेरणादायी आहे. आपण सर्वांनी मिळून देशाच्या उभारणीत योगदान द्यायचे आहे, ज्यामध्ये रोजगारात समावेशकता, सक्षमता आणि शाश्वतता आहे.

## जवाहर नवोदय विद्यालय मध्ये इयत्ता '६ वी' पान नं.१ वरून...

भरावा लागेल. जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेश घेण्यासाठी अनेक पात्रता निकष आहेत, जे पूर्ण करणे अनिवार्य आहे.

**पात्रता-** १. विद्यार्थ्यांना त्यांच्या जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेश मिळेल. प्रवेश अर्ज भरण्यासाठी, विद्यार्थ्यांना निवास प्रमाणपत्र देखील सादर करावे लागेल.

२. जवाहर नवोदय विद्यालय इयत्ता ६ मध्ये प्रवेश मिळविण्यासाठी, विद्यार्थ्याने कोणत्याही सरकारी शाळेतून किंवा सरकारी अनुदानित शाळेतून किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेतून इयत्ता ३, ४ आणि ५ वी शिकलेली आणि उत्तीर्ण असावी.

३. विद्यार्थ्याला जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा देण्याची फक्त एकच संधी मिळेल.

४. जवाहर नवोदय विद्यालयातील ७५ टक्के जागा ग्रामीण भागातील मुलांसाठी राखीव आहेत. उर्वरित २५ टक्के जागांवर गुणवत्तेच्या आधारे शहरी आणि ग्रामीण भागातील मुलांना प्रवेश दिला जाईल.

५. ग्रामीण कोट्यात प्रवेश मिळविण्यासाठी, विद्यार्थ्याने कोणत्याही सरकारी शाळेतून किंवा सरकारी अनुदानित शाळेतून किंवा त्याच्या ग्रामीण जिल्ह्यातील कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेतून इयत्ता ३, ४ आणि ५ उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

६. कोणत्याही शहरी सरकारी शाळेतून किंवा सरकारी अनुदानित शाळेतून किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेतून इयत्ता ३, ४ आणि ५ पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना शहरी भागातील मानले जाईल.

अर्ज करण्याची अंतिम दिनांक: २९ जुलै २०२५

अर्ज करण्यासाठी संकेत स्थळ: navodaya.gov.in व cbseitms.nic.in

JNVST इयत्ता ६ वी प्रवेश २०२६: अर्ज कसा करायचा

१. नवोदय विद्यालयाच्या अधिकृत वेबसाइट navodaya.gov.in ला भेट द्या.

२. Click here for Class VI Registration २०२५ या लिंकवर क्लिक करा

३. एक नवीन पेज उघडेल जिथे उमेदवारांना नोंदणी लिंकवर क्लिक करावे लागेल.

४. अर्ज फॉर्म भरा आणि अर्ज शुल्क भरा आणि सबमिट वर क्लिक करा.

५. लक्षात ठेवा की अर्ज करताना, खालील कागदपत्रांचे JPG स्वरूपात १० ज्ञल ते १०० ज्ञल आकाराचे फोटो अपलोड करावे लागतील.

६. फोटो, पालकांची स्वाक्षरी, विद्यार्थ्याची स्वाक्षरी, आधार कार्ड तपशील. लक्षात ठेवा की प्रमाणपत्र विद्यार्थ्याच्या तपशीलांसह मुख्याध्यापकांनी पडताळले पाहिजे.

**नोट :** जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी (JNVST) च्या आधारे केला जाईल.

## आयटीआय प्रवेशासाठी सुधारित पान १ वरून...

यादी ९ जुलै रोजी प्रसिद्ध होणार आहे.

राज्यात ४१९ सरकारी आणि ५८८ खासगी अशा एकूण एक हजार सात आयटीआयमध्ये प्रवेशासाठी ही प्रक्रिया राबवली जात आहे.१५ मेपासून सुरू झालेल्या या प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत १.३९ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी झाली असून त्यापैकी १.२५ लाख अर्ज अंतिम करण्यात आले आहेत. मात्र, केवळ ६८ हजार ५८३ विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम सादर केला आहे. अजूनही अनेक विद्यार्थ्यांनी महत्त्वाचे टप्पे पूर्ण केलेले नाहीत.यापूर्वी केवळ नोंदणीसाठी वेळापत्रक जाहीर करण्यात आले होते. आता संचालनालयाने संपूर्ण प्रवेशप्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर करत प्रवेशाची दिशा स्पष्ट केली आहे.

ऑनलाइन अर्ज करण्याचा अंतिम दिनांकः २६ जून, सायं. ५ वाजेपर्यंत

प्रवेश अर्ज निश्चित करण्याची मुदतः २७ जून, सायं. ५ वाजेपर्यंत
पसंतीक्रम / प्राधान्य सादर करणे: २७ जून, सायं. ५ वाजेपर्यंत
प्राथमिक गुणवत्ता यादी: ३० जून, सकाळी ११ वाजता
हरकती सादर करण्याची मुदतः १ जुलै, सायं. ५ वाजेपर्यंत
अंतिम गुणवत्ता यादी : ३ जुलै, सायं. ५ वाजता
पहिली प्रवेश यादी : ९ जुलै, सायं. ५ वाजता
प्रत्यक्ष प्रवेश (प्रथम फेरी): १० ते १५ जुलै, सायं. ५ वाजेपर्यंत
दूसरी प्रवेश फेरी : २३ ते २८ जुलै
तिसरी प्रवेश फेरी : २८ जुलैपासून
चौथी प्रवेश फेरी : ४ ते ८ ऑगस्ट
संस्था स्तरावर समुपदेशन फेरी - २१ ऑगस्ट

राज्यातील ITI प्रवेश प्रक्रियेला वेग आला असून, प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक जाहीर झाले आहे. विद्यार्थी २६ जूनपर्यंत ऑनलाइन अर्ज करू शकतील आणि पहिली गुणवत्ता यादी ९ जुलै रोजी प्रसिद्ध होईल. एकूण १,०७ ITI संस्थांमध्ये प्रवेशासाठी प्रक्रिया सुरू असून, आतापर्यंत १.३९ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे.

# पाकिस्तानची झोप उडवणार 'चिनाब पूल'

भारत रोज नवनवीन विकासाचे टप्पे पार करत आहेत. यामधील एक महत्त्वकांशी प्रकल्प समृद्धी महामार्गाचे काल उद्घाटन करण्यात आले आहे. तर आज चिनाब पूलाचे उद्घाटन केले जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या पुलाचे उद्घाटन होणार आहे. संपूर्ण देशासह जगभरामध्ये या पूलाची चर्चा रंगली आहे. जम्मू-काश्मीरमध्ये असलेल्या या चिनाब पूलाने शेजारील देश पाकिस्तानला धडकी भरवली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जम्मू-काश्मीर दौऱ्यावर जाणार आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर त्यांचा हा दौरा महत्त्वपूर्ण मानला जात आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षेमध्ये देखील मोठी वाढ करण्यात आली आहे. पंतप्रधानांच्या हस्ते चिनाब पूल, अंजी पूल यांचे उद्घाटन करण्यात येणार आहे. भारतातील पहिला केबल-स्टेड रेल्वे पूल अंजी पूल आणि उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल लिंक (USBRL) प्रकल्प यांचा समावेश आहे. त्याचबरोबर ४६,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी पंतप्रधान करणार आहेत. यातील चिनाब पूल हा जगातील सर्वात उंच रेल्वे पूल असणार आहे. जम्मू काश्मीरमधील हा प्रकल्प अतिशय चिनाब नदीपासून ३५९ मीटर उंचीवर असलेला वास्तुशिल्पाचा अद्भुत नमूना चिनाब रेल्वे पूल आहे. हा जगातील सर्वात उंच रेल्वे आर्च ब्रिज आहे. हा १,३१५ मीटर लांबीचा स्टील आर्च ब्रिज आहे जो भूकंप आणि वाऱ्याच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी डिझाइन केलेला आहे. पुलाचा एक महत्त्वाचा परिणाम जम्मू आणि श्रीनगरमधील कनेक्टिव्हिटी वाढवण्यात होईल. पुलावरून जाणाऱ्या वंदे भारत ट्रेनद्वारे, कटरा आणि श्रीनगर दरम्यान प्रवास करण्यासाठी फक्त ३ तास लागतील, ज्यामुळे सध्याचा प्रवास वेळ २-३ तासांनी कमी होईल.

भारताच्या या प्रकल्पामुळे शेजारील देशाची झोप उडाली आहे. पंतप्रधान श्री माता वैष्णोदेवी कटरा ते श्रीनगर या दोन वंदे भारत गाड्यांना हिरवा झेंडा दाखवतील, ज्यामुळे या प्रदेशातील रेल्वे कनेक्टिव्हिटी आणखी मजबूत होणार आहे. यामुळे पर्यटनामध्ये देखील मदत होणार आहे. हे सर्व प्रकल्प हिमालयीन प्रदेश, पीर पंजाल पर्वतरांगाभोवती केंद्रित आहे, ज्याला मोदींचे चिनाब चक्रव्यूह म्हटले जात आहे. यामुळे शेजारील देशांना धडकी भरली आहे.

पीर पंजाल खिंड (ज्याला पीर की गली असेही म्हणतात) हा हिमालयाचा विस्तार आहे. मुघल रोडने काश्मीर खोऱ्याला राजौरी आणि पूंछशी जोडते.

हे मुघल रोडवरील ३,४९० मीटर (११,४५० फूट) उंचीवरील सर्वात उंच ठिकाण आहे आणि काश्मीर खोऱ्याच्या नैऋत्येस आहे. काश्मीर खोऱ्यातील खिंडीपासून जवळचे शहर शोपियान आहे. पहलगाम हल्ला झालेल्या ठिकाणाजवळील बैसरन खोऱ्यातील जंगले देखील पीर पंजालशी जोडलेली आहेत.

## खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया

**नौकरी एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर योजने अंतर्गत ऑगस्ट २०२५ सत्रातील प्रवेश हे केंद्रिय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियाद्वारे करण्यात येत आहे.येथील हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सर्व व्यवसाय मिळून ४१२ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. प्रवेशासाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख २६ जून २०२५ असून प्रवेश अर्ज निश्चित करणे व संस्थानिहाय व्यवसायाचे विकल्प व प्राधान्य क्रम भरण्याची अतिम दिनांक २७ जून २०२५ आहे.

उमेदवारांनी प्रवेश अर्ज ऑनलाईन भरणे गरजेचे आहे. अर्ज भरण्यासाठी उमेदवारांनी ITI -dmission Portal:https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

आय.टी.आय. प्रवेशासाठी या संस्थेत, फॅशन टेक्नॉलॉजी, सुईंग टेक्नॉलॉजी, कोपा, डीझेल, संधाता, पत्रेकारागीर, यंत्रकारागीर, कातारी, जोडारी, यांत्रीक विजक, प्रशितन व वातानुकूलित टेक्नीशियन, आरेखक स्थापत्य, यांत्रीक मोटार गाडी, विजतंत्री, तारतंत्री असे एकुण १५ व्यवसाय उपलब्ध आहेत. महिलासाठी प्रत्येक व्यवसायात ३० टक्के जागा राखीव आहेत व अधिक माहितीसाठी वरील संकेतस्थळावर भेट द्यावी व जास्तीत जास्त उमेदवारांनी प्रवेश अर्ज भरावेत विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरतांना काही अडचण आल्यास संस्थेतील प्रवेश विभागास संपर्क साधावा, असे आवाहन रजनी शेळके प्राचार्य यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग; महाराष्ट्राची भाग्यरेषा

राज्याची प्रगती अधिक गतिमान करण्यात दळणवळण सुविधांची व्यापक उभारणी महत्त्वाची बाब आहे. त्याला प्राधान्य देत शासन नागरिकांच्या प्रवास सुविधेच्या दृष्टीने अनेक प्रकल्प गतीने पूर्ण करत आहे. यामध्ये सर्वात महत्त्वाचा ठरलेला ७०१ कि.मी लांबीचा हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग आता अंतिम टप्प्यासह पूर्णपण सुरु होत आहे.

विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासह राज्यातील २४ जिल्ह्यांना कलाटणी देणाऱ्या हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या नागपूर ते शिर्डी या ५२० किलोमीटर लांबीच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि. ११ डिसेंबर २०२२ रोजी पार पडले. दुसऱ्या टप्याचे अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी (कोकमठाण) ते नाशिक जिल्ह्यातील भरवीर इंटरचेंज दरम्यान एकुण ८० कि.मी लांबीचे लोकार्पण दि. २६ मे २०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले तर समृद्धी महामार्गाच्या भरवीर इंटरचेंज ते इगतपुरी पर्यंतच्या २५ किमीच्या तिसऱ्या टप्प्याचे लोकार्पण दि. ४ मार्च २०२४ रोजी तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादाजी भुसे यांच्या हस्ते झाले होते. एकूण ७०१ कि.मी पैकी ६२५ कि.मी लांबीचा हा महामार्ग सध्या वाहतुकीस सुरु असून आतापर्यंत जवळजवळ २ कोटी वाहनधारकांनी समृद्धी महामार्गाचा वापर केला आहे. आता, समृद्धी महामार्गाची उर्वरित ७६ कि. मी लांबीचे (इगतपुरी ते आमणे) लोकार्पण दि. ०५ जून २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होत आहे.

### प्रकल्पाची व्याप्ती

राज्याच्या पाच महसुल विभागाच्या १० जिल्ह्यातील २६ तालुक्यांमधील ३९२ गावांमधुन जाणारा हा सहा पदरी महामार्ग ग्रीन फिल्ड सरेखन आहे. समृद्धी महामार्गामुळे नागपूर, वर्धा, अमरावती, वाशीम, बुलढाणा, जालना, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिक व ठाणे हे १० जिल्हे प्रत्यक्षरीत्या जोडले जातात. तसेच समृद्धी महामार्गामुळे चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ, अकोला, हिंगोली, परभणी, नांदेड, बीड, धुळे, जळगाव, पालघर व रायगड हे १४ जिल्हे अप्रत्यक्षरीत्या जोडले जातात. जुन्या नागपूर मुंबई मार्गावरुन नागपूरहून मुंबईकडे येण्यास १७-१८ तास लागतात. नवीन ग्रीनफिल्ड एक्सप्रेसवे ने प्रवास ८ तासात करणे शक्य होणार आहे. आता मुंबईतील जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट ते नागपूरस्थित मिहान यांना जोडणाऱ्या या महामार्गामुळे बंदरावरुन जलद वाहतूक करुन आवश्यक माल भारतभर वेळेवर पोहोचवणे शक्य होणार आहे. हा प्रकल्प देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर गुंतवणुकीच्या आधारे राज्यातल्या ग्रामीण भागास महत्वाचा ठरलेला आहे.

हा महामार्ग दिल्ली- मुंबई द्रुतगती मार्ग, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट आणि शिर्डी, अजिंठा - वेरुळ लेणी, लोणार सरोवर आणि इतर पर्यटन स्थळांना जोडणारा आहे. देशाचे ग्रोथ इंजिन असणाऱ्या महाराष्ट्रासाठी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग ही खऱ्या अर्थाने समृद्धीची भाग्यरेषा ठरणार आहे.

### वैशिष्ट्यांनी समृद्ध महामार्ग

राज्य शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प असेलला समृद्धी महामार्ग हा अभियांत्रिकी कौशल्यासह अनेक वैशिष्ट्यानींही समृद्ध असा महामार्ग आहे. दळणवळणाची गतिमान घौडदौड साध्य करत पर्यंटन, उद्योग, शेतमालाला कमी वेळेत बाजारपेठेत पोहोचवण्यास सहाय्यक ठरत असलेल्या समृद्धी महामार्गावरुन आतापर्यंत अंदाजे दोन कोटी वाहनांनी प्रवास करत सुखद, रहदारीमुक्त सुलभ, गतिमान प्रवासाचा अनुभव घेतला आहे.

### सर्वाधिक लांबी रुंदीचा बोगदा

समृद्धी महामार्गाच्या उर्वरित टप्प्यातील ७६ कि.मी. ची लांबी ही नाशिक व ठाणे या दोन जिल्ह्यात येते. सह्याद्रीच्या पर्वतरांगामधून खडतर मार्ग काढत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने अभियांत्रिकी आव्हान पेलले. या टप्प्यामध्ये एकूण ५ दुहेरी बोगदे असून या बोगद्यांची लांबी १०.७३ कि.मी (दोन्ही मार्गिका मिळून एकूण लांबी २१.४६ कि.मी) आहे. त्यातील पॅकेज १४ (इगतपुरी) येथील बोगदा ८.०० कि.मी लांबीचा असून हा महाराष्ट्रातील सर्वाधिक लांबी व रुंदीचा (१७.६१ मीटर) बोगदा आहे. या बोगद्याची उंची ९.१२ मीटर आहे.

### प्रथमच बोगद्यात वापरण्यात येणारी अग्निशमन यंत्रणा

अग्निसुरक्षेसाठी भारतातील कोणत्याही बोगद्यात प्रथमच वापरण्यात येणारी अग्निशमन यंत्रणा इगतपुरीमधील सर्वात लांबीच्या बोगद्यामध्ये बसविण्यात आलेली आहे. या बोगद्यामुळे अंदाजे आठ मिनिटात इगतपुरी ते कसारा हे अंतर पार करता येणार आहे. त्यातून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ नाशिक महामार्गावरील कसारा घाटाला पर्यायी मार्ग उपलब्ध झाला आहे. त्यामुळे वाहतूक अधिक जलद होणार आहे, कसारा घाटातील वाहतूक अधिक गतीमान होण्यासही त्यामुळे सहाय्य होणार आहे.

### सर्वाधिक लांबीचा पूल

भौगालिक परिस्थितीतून मार्ग काढत महामार्गाचे काम पुढे नेत असताना नाशिक व ठाणे या जिल्ह्यातील ७६ किमीच्या डोंगर दऱ्यामुळे व्हायाडक्ट (मोठे पूल) व बोगदे बांधणे हे मोठे जिकरीचे होते. काही ठिकाणी कठीण खडकात ३० ते ४० मीटरपर्यंत खोदकाम करावे लागले. या टप्प्यात एकूण १७ व्हायाडक्ट (मोठे व्हॅली पूल) असून त्याची एकूण लांबी १०.५६ कि.मी (दोन्ही मार्गिका मिळून एकूण लांबी २१.१२ कि.मी) आहे. या टप्प्यात सर्वाधिक लांबीचा पूल (व्हायाडक्ट) २.२८ कि.मी लांबीचा आहे. या टप्प्यात एका ठिकाणी (व्हायाडक्ट-२) पुलाच्या काही खाबांची उंची ८४ मीटरपर्यत आहे.



### इंटरचेंजेस

या टप्प्यात इगतपुरी, खुटघर व आमणे येथे इंटरचेंज येतात. या शेवटच्या टप्यात मोठ्या प्रमाणात विद्युत उच्च तसेच कमी दाबाच्या विद्युत वाहिन्या स्थंलातरित कराव्या लागल्या, त्यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या कमी दाबाच्या ६२ वाहिन्या स्थंलातरित करण्यात आलेल्या आहेत, तसेच, टोरेंट पॉवरच्या ५ विद्युत वाहिन्या व पॉवर ग्रीडची १ विद्युत वाहिनी स्थलांतरित करण्यात आलेली आहे. तसेच, या टप्प्यात १ रेल्वे ओलांडणी पुल बांधण्यात आलेला आहे.

पर्यावरण पूरक

प्रकल्पामध्ये वन्यजिव संरक्षणासाठी एकूण १०० बांधकामे पूर्ण झाली असून, त्यांची रचना वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आली आहे. वन्यजीवांच्या वावरासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या ठिकाणी 'ध्वनी रोधक' ची तरतूद करण्यात आली आहे. समृद्धी महामार्गाच्या दुतर्फा ११ लक्ष ३१ हजार झाडे लावण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच या प्रकल्पामध्ये एकूण २०३ मेगा व्हॅट सौर उर्जा निर्मिती प्रस्तावित आहे.

### प्रवासातील सुलभता

इगतपुरी ते आमणे (ता. भिवंडी) हा ७६ किमीचा टप्पा वाहतुकीस सुरु झाल्यानंतर ठाणे (आमणे) व नागपूर पर्यंतचा प्रवास आठ तासात करणे सहजतेने शक्य होणार आहे. तसेच ठाणे, मुंबई परिसरातून शिर्डी येथे जाणाऱ्या भाविकांनाही या महामार्गामुळे आपला प्रवास सुलभरित्या व जलदपणे करणे शक्य होणार आहे. त्यासोबतच शिर्डी, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील सिन्नर व इगतपुरी परिसरातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल सुलभतेने कमी कालावधीत मोठ्या बाजारपेठांपर्यंत पोहोचवता येणार आहे. शेतकरी, उद्योजक, प्रवाश्यांना मुंबई महानगर प्रदेशात कामानिमित्त वरचवेर येणे जाणे हे अधिक सोयीस्कर होणार असून शैक्षणिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक संधीचे क्षेत्र विस्तारण्याच्या दृष्टीनेही हा महामार्ग निश्चितच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या सहाय्यक ठरणारा आहे.

राज्याच्या उपराजधानीला राज्याच्या राजधानीपर्यंत जोडणार नागपूर ते मुंबई दरम्यानचे अतंर अवघ्या आठ तासांवर आणणारा समृद्धी महामार्ग निश्तिच महाराष्ट्राच्या औद्यागिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासालाही गतिमान करणारा ठरेल, यात शंका नाही.

**-शब्दांकन**
**वंदना थोरात, वारेगावक**
**विभागीय संपर्क अधिकारी**

# 'आयटीआय'चे अभियांत्रिकी ट्रेड्स सर्वोत्तम पर्याय

औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) हे विद्याथ्यर्थ्यांसाठी एक महत्त्वाचे व्यावसायिक शिक्षणाचे केंद्र बनले आहे. विशेषतः अभियांत्रिकी (एपसळपशशीळपस) क्षेत्रात प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांसाठी आयटीआय हा सर्वोत्तम पर्याय ठरत असल्याचे सिद्ध होत आहे. येथे दिले जाणारे प्रशिक्षण एक किंवा दोन वर्ष कालावधीचे असते. यात अनेक तांत्रिक व उद्योग क्षेत्राशी संबंधित कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाते.

'आयटीआय'चे अभियांत्रिकी ट्रेड्स हे विशेषतः हाताने काम करणाऱ्या, यंत्रावर काम करणाऱ्या, विद्युत व यांत्रिक उपकरणांवर काम करणाऱ्या उमेदवारांसाठी अतिशय योग्य आहे. फिटर, टर्नर, मशिनिस्ट, वेल्डर, इलेक्ट्रिशियन, मोटार मेकॅनिक, डिझेल मेकॅनिक, इलेक्ट्रॉनिक मेकॅनिक, वायरमन, ड्राफ्ट्समन आणि प्लंबर यांसारख्या अनेक ट्रेड्समध्ये विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले जाते. हे सर्व अभ्यासक्रम प्रात्यक्षिकावर आधारित असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष उद्योगातील कामासाठी आवश्यक असलेली कौशल्ये विकसित होतात.

आयटीआय शिक्षण घेतल्यानंतर काय करावे?

'आयटीआय'चे दोन वर्षांचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमामध्ये (डिप्लोमा) थेट दुसऱ्या वर्षी प्रवेश मिळतो. उदा. इलेक्ट्रिशियन किंवा वायरमन कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग पदविकेमध्ये दुसऱ्या वर्षी थेट प्रवेश मिळू शकतो. अशाच प्रकारे फिटर, टर्नर, मशिनिस्ट यांना मेकॅनिकल इंजिनीयरिंगमध्ये, तर इलेक्ट्रॉनिक मेकॅनिकसाठी इलेक्ट्रॉनिक्स पदविका शाखा उपलब्ध होते.'आयटीआय'मधील ट्रेड पूर्ण केल्यानंतर उमेदवार अनेक मागांनी आपले करिअर घडवू शकतात. कोणी पदविका करून पुढे इंजिनीअरिंगची पदवी (इए/इ.ढशलह) करू शकतो, तर काहीजण नोकरीकडे वळतात. खासगी क्षेत्रात टेक्निशियन, मशिन ऑपरेटर, लाइनमन किंवा सर्व्हिस इंजिनीअर अशा विविध पदांवर नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. शिवाय रेल्वे, महावितरण, एमएसईबी, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अन्य सरकारी क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर भरती केली जाते. यासाठी संबंधित भरती परीक्षा आणि शिकाऊ उमेदवारी (अप्रेंटिसशिप) उपलब्ध असतात.

'आयटीआय'चे ट्रेड ग्रामीण आणि शहरी भागातील तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी खूप फायदेशीर ठरतात. कमी खर्चात तांत्रिक शिक्षण घेऊन स्वतःचा व्यवसाय सुरू करता येतो. वेल्डर, इलेक्ट्रिशियन, प्लंबर व्यवसायांमध्ये स्वावलंबी होण्याच्या मोठ्या संधी आहेत. काही विद्यार्थी स्वतःची वर्कशॉप, सर्व्हिस सेंटर किंवा बांधकाम संबंधित कामे सुरू करतात. 'स्किल ट्रेनिंग सेक्टर'मधील हे तांत्रिक शिक्षण हे केवळ कौशल्य विकसित करणारे नसून, स्वावलंबनाकडे नेणारे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे तरुणांनी 'आयटीआय'चा पर्याय केवळ 'शेवटचा पर्याय' म्हणून न पाहता, एक सक्षम आणि व्यावसायिक वाटचाल म्हणून पाहण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील अनेक यशस्वी व्यावसायिकांची सुरुवात 'आयटीआय' मधूनच झालेली आहे आणि विशेषतः त्यांनी अभियांत्रिकी ट्रेड निवडल्याचे दिसून येते, ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे.

# नीट युजी परीक्षेचा निकाल जाहीर




राष्ट्रीय चाचणी संस्था म्हणजेच NTA ने देशातील सर्वात कठीण परीक्षांपैकी एक असलेल्या NEET UG परीक्षा २०२५ चा निकाल जाहीर केला आहे. NTA ने शनिवारी म्हणजेच १४ जून रोजी NEET UG परीक्षा २०२५ (NEET UG निकाल २०२५ बाहेर) चा निकाल जाहीर केला आहे. निकालापूर्वी छढ- कडून अंतिम उत्तर की देखील जारी करण्यात आली आहे. अशा परिस्थितीत, या परीक्षेत बसलेले विद्यार्थी पशशीं.पीर.पळल.ळप या अधिकृत वेबसाइटला भेट देऊन त्यांचे निकाल तपासू शकतात.

राष्ट्रीय चाचणी संस्था ने १४ जून रोजी दुपारी १ वाजता NEET UG 2025 चा निकाल जाहीर केला आहे.

**सविस्तर वृत्त पान ३ वर पहा..**

**प्रश्न.०१–रवि त्याचे बहिणीपेक्षा ७३२ दिवसानी मोठा आहे. ज्याचा जन्म सोमवारी झाला,तर त्याच्या बहिणीचा जन्मवार कोणता?**

अ) सोमवार ब) शुक्रवार क) शनिवार ड) रविवार

**प्रश्न.०२–रांगेत रमेश मध्यभागी उभा असुन त्याच्या उजव्या बाजुला १५ मुले आहेत.तर रांगेत किती मुले आहेत?**

अ) ३२ ब) ३० क) ३१ ड) २९

**प्रश्न.०३–चौरस माजा.**



अ) १०
ब) ११
) १२
ड) १४

**प्रश्न.०४– ८:३० वा.तास काटा व मिनिट काटा यामधील कोण किती अंशाचा असेल?**

अ) ७५ ब) ६५ क) ८५ ड) ९०

**प्रश्न.०५–X,T,P,L,?**

अ) J ब) K क) I ड) H

**प्रश्न.०६– एका सांकेतिक लिपित CITY हा शब्द GMXC असा लिहीला जात असेल,तर DUTY हा शब्द कसा लिहावा?**

अ) HYWD ब) HYXD क) HYWC ड) HYXC

**प्रश्न.०७ – जर C=4,B=6,E=8,.... तर २८०६ याचा अर्थ काय?**

अ) DEAB ब) DAEB क) BDAE ड) BEAD

**प्रश्न.०८ –१४:४९::३४:?**

अ) 18 ब) 64 क) 100 ड) 119

**प्रश्न.०९ – समोरच्या व्याक्तीकडे बघत वासुदेव म्हटला की,मुझा मुलगा हा माझया मुलाचा काका आहे. तर त्या व्याक्तीचे आणि वासुदेवचे नाते काय?**

अ) भाउ ब) वडिल क) आजोबा ड) काका

**प्रश्न.१० – पुढील विसंगत अक्षरगट शोधा?**

AZB,BCY,CXD,DWE

अ) AZB ब) BCY क) CXD ड) DWE

**प्रश्न.११ –** edd_eefg_h_y_jkk

अ) dgghj ब) eghhj क) dghij ड) eggij

**प्रश्न.१२– जर** 3x4=912,2x9=418, **आणि** 5x4=2520 **तर** 8x3= ?

अ) 6024 ब) 6424 क) 4012 ड) 2464

**प्रश्न.१३ – सुमित आणि सुनिती यांच्या आजच्या वयांचे गुणत्तर ६:५ आहे. २ वर्षापूर्वी त्यांच्या वयाचे गुणोत्तर ५:४ होते.तर सुमीतचे आजचे वय किती ?**

अ) १२ वर्षे ब) १० वर्षे क) ८ वर्षे ड)१४ वर्षे

**प्रश्न.१४ – १४ ते १६ माहितीच्या आधारे**

A, B, C, D, E,F **हे एका कुटुंबातील सदस्य आ–हेत. त्यात इंजिनिअर, स्टेनोग्राफर, डॉक्टर, नकाशेदार, वकील आणि न्यायाधीश आहे.**

**(क्रमागत नाही)** A **इंजिनिअर आहे. ज्याचे लग्न स्टोनोग्राफरशी झालेले आहे. न्यायाधीशाचे वकिलीशी लग्न झालेले आहे.**

F **जो नकाशेदार आहे तो** B **चा मुलगा आहे. आणि** E **चा भाऊ आहे.** C **वकिल आहे. जी** D **ची सून आहे.**

E **लग्न न झालेली आहे.** D **ही** F **ची आजी आहे. अन कुटुंबात २ विवाहित दांम्पत्य आहे.**

**प्र. १४** B **चा व्यवसाय कोणता?**

अ) न्यायाधीश ब) वकिल क) नकाशेदार ड) स्पष्ट होत नाही.

**प्र. १५ विवाहित दाम्पत्य कोणते?**

अ) फक्त AD ब) फक्त DC क) BC व AD ड) AC व BD

**प्र. १६** D **चा व्यवसाय कोणता?**

अ) न्यायाधीश ब) स्टेनोग्राफर क) डॉक्टर ड) स्पष्ट होत नाही.

**प्र. १७** 1500 **च्या – च्या** $\frac{1}{5}$ **किती?**

अ) २५० ब) २६० क) ५०० ड) ५५०

**प्र. १८ भिन्न संख्या ओळखा ? – ०९, १०, १६, ३६, ८१**

अ) ०९ ब) १० क) ८१ ड) १६

**प्र. १९ खालील शब्द समूहातील विसंगत शब्द ओळखा?**

अ) WATCH ब) CLOCK क) CATCH ड) MATCH

**प्र. २०** A **हा** B **पेक्षा उंच ,** M **हा** A **पेक्षा उंच,** G **हा** M **पेक्षा उंच ,** Y **सर्वात उंच आहे, तर उंचीच्या तुलनेत मध्यस्थानी को असेल ?**

अ) M ब) G क) A ड) B

**प्र. २१. भारताचा सर्वाधिक भूभाग .... व्यापला आहे?**

अ) पर्वताने ब) मैदानी प्रदेशाने क) प्राचीन पठाराने ड) वाळवंटे

**प्र. २२. वन मृदा.... रंगाची असते?**

अ) गडद पिवळ्या ब) गडद तपकिरी क) गडद लाल ड) गुलाबी

**प्र. २३. शिख धर्माचे तिर्था असलेले मंदिर कोठे आहे**

अ) लुधियाना ब) चंदीगढ क) अमृतसर ड) दिल्ली

**प्र. २३. शिख धर्माचे तिर्थ असलेले मंदीर कोठे आहे?**

अ) लुधियान ब) चंदिगड क) अमृतसर ड) दिल्ली

**प्र.२४. तारापूर पावर प्लान्टमध्ये कोणत्या प्रकारची वीज तयार होत?**

अ) कोळस ब) सौर क) जल ड) अणुऊर्जा

**प्र. २५. २०१६ या टाईम्स पर्सन ऑफ इअर कोण आहेत.**

अ) डोनाल्ड ट्रम्प ब) व्लादिमिर पुतिन
क) मार्क झुकेरबर्ग ड) हिलरी क्लिंटन

**प्र.२६.१५ फेब्रुवारी PSLV-C37 यानाने इस्त्रोने किती उपग्रह सोडले?**

अ) १०३ ब) १०४ क) १०५ ड) १०६

**प्र. २७. पिनाका हे आर्मीशी संबंधित काय आहे**

अ) मल्टी बॅरल रॉकेट लॉन्चर ब) टँक
क) मिसाईल ड) रायफल

**प्र. २८. ऑगस्ट २०१६ मध्ये भारताने कोणती पाणबुडी नौदलात दाखल केली**

अ) विक्रांत ब) अरिहंत क) चक्रा ड) स्कॉर्पिअन

# महाराष्ट्र पोलीस भरती

# सराव प्रश्नपत्रिका

**प्र. २९. हरितक्रांती कशाशी संबंधित आहेत**

अ) पेट्रोलियम ब) मत्स्य क) दुग्ध ड) अन्न–धान्य

**प्र. ३०. अल्फ्रेड नोबेल यांनी कशाचा अविष्कार केला होता**

अ) डायनामाईट ब) ऑक्सीजन आणु
क) टेलिफोन ड) इंटरनेट

**प्र. ३१. ऑस्कर पुरस्कार कोणत्या क्षेत्राशी संबंधित आहे**

अ) चित्रपट ब) खेळ क) विज्ञान ड) समाजसेवा

**प्र. ३२. कविता राऊत या कोणत्या क्रीडा प्रकाराशी संबंधित आहेत**

अ) बुद्धिबळ ब) धावपटू क) रेसलर ड) धनुर्विद्या.

**प्र. ३३. २०१५ चा महाराष्ट्र भुषण पुरस्कार कोणाला मिळाला**

अ) शरद पवार ब) विजय तेंडूलकर
क) बाबासाहेब पुरंदरे ड) शशांक शेंडे

**प्र. ३४.** Ace Against odds **कोणाचे आत्मचरित्र आहे**

अ) लियांडर पेस ब) महेश भूपती
क) सनिया मिर्झा ड) सायना नेहवाल

**प्र. ३५. २०१६ रिओ ऑलिम्पिक मध्ये पी.व्ही.सिंधू हिने कोणते पदक प्राप्त केले**

अ) गोल्ड ब) सिल्व्हर क) ब्राँझ ड) सहभाग घेतला नाही.

**प्र. ३६. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालय कोठ आहे**

अ) हेग ब) न्युयॉर्क क) टोकिओ ड) नवी दिल्ली

**प्र. ३७. क्वशियोर्कर हा रोग लहान मुलांना कशाच्या कमीपणामुळे होते**

अ) प्रोटीन ब) व्हिटॅमीन क) आयोडीन ड) आयर्न

**प्र. ३८. अठराव्या शतकापर्यंत.... हा खंड अज्ञातखंड म्हणून ओळखला जात होता**

अ) आशिया ब) अफ्रिका क) अमेरिका ड) ऑस्ट्रेलिया

**प्र. ३९. CCTNS चा अर्थ काय आहे ?**

अ) Crime and Criminal Tracking Networking System
ब) Criminal Crime Tracking Networking System
क) Crime of Tracking Networking System
ड) See Crime Tracking Networking System

**प्र. ४० मिसाईल मॅन असा ..यांचा उल्लेख केला जातो?**

अ) सतीश धवन ब) माधवन नायर
क) डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम
ड) प्रणव मुखर्जी

**प्र ४१. नागरिकांना मूलभूत हक्क व स्वातंत्र्य...... शासन पद्धतीमध्ये मिळतात?**

अ) लोकशाही क) राजेशाही
ब) हुकूमशाही ड) सरंजामशाही

**प्र.४२ राजा हर्षवर्धनचा पराभव.. याचालुक्यराजाने केला?**

अ) दुसरा पुलकेशी ब) किती वर्मन
ब) जससिंग ड) विनय आदित्य

**प्र. ४३. कोल्हापुरच्या शिलाहारवर.या यादव राजाने विजय मिळविला**

अ) महादेव ब) जैतुगी
ब) कृष्णदेव ड) सिंघन द्वितीय

**प्र. ४४ आर्य समाजाची स्थापना .... याने केली.**

अ) स्वामी श्रद्धानंद ब) स्वामी दयानंद
ब) स्वामी विवेकानंद ड) स्वामी स्वरूपानंद

**प्र. ४५ महाराष्ट्राचे आद्य क्रांतीकारक ... होते.**

अ) विष्णुबुवा ब्रम्हचारी ब) वासुदेव बळवंद फडके
ब) चाफकर बंधु ड) अनंद कान्हेरे

**प्र. ४६. ताराबाई मोडक यांनी आदिवासीसाठी.... जिल्ह्याक कार्य सुरू केले.**

अ) रागयड ब) नाशिक ब) ठाणे ड) अमरावती

**प्र. ४७ १९३७ मध्ये मराठवाडा साप्ताहिकाची स्थापना .... यांनी केली**

अ) वामनराव नाईक ब) आ.कृ. वाघमारे
ब) केशवराव कोरटकर ड) ग.त्र्य.माडखोलकर

**प्र. ४८ राज्यपाल व मंत्रिमंडळ हे.... ह्य दुव्यामुळे साधले जाते**

अ) गृहमंत्री ब) महापौर
ब) विधानसभा अध्यक्ष ड) मुख्यमंत्री

**प्र. ४९ रू. १,२०,००० अ,ब,क,ड या ४ मित्रांमध्ये १:३:७:५ या प्रमाणात वाटायचे असल्यास 'ब' च्या वाट्याला किती रूपये येतील**

अ) २२,५०० ब) १७,५००
ब) २७,५०० ड) २९,५००

**प्र. ५० १२ मजुर एक काम २० दिवसात पुर्ण करतात, तेच काम १५ मजुर किती दिवसात पूर्ण करतील**

अ) १२ दिवस ब) २० दिवस ब) १० दिवस ड) १६ दिवस

**प्र. ५१. सुरेखाने आपल्या पगाराच्या ३/५ रक्कम घर खर्चासाठी ३/८ रक्कम वैद्यकीय कारणास्तव खर्च केलीतेंव्हा तिच्या जवळ रू.२,२५० शिल्लक राहिती तर तिचा पगार किती**

अ) रू.१५,५०० ब) रू. १७,५००
ब) रू.१५,००० ड) रू.१६,५००

**प्र. ५२. एका वस्तुची किंमत २५ टक्के वचाढविली त्यामुळे खप २० टक्के कमी झाला तर उत्पन्नावर काय परिणाम होईल**

अ) ५ टक्के वाढ ब) ५ टक्के घट
ब) २.५ टक्के वाढ ड) फरक नाही

**प्र. ५३. एक २०० मीटर लांबीची रेल्वे तिच्या दुप्पट लांबीचे प्लॅटफॉर्म ३६ सेकंदात ओलांडते तर त्या रेल–वेचा ताशी वेग किती**

अ) ६० किमी ब) ४८ किमी ब) ६४ किमी ड) ६६ किमी

**प्र. ५४ रू.५००० वर २ वर्षांसाठी ८ टक्के प्रतिवर्ष व्याजदाराने चक्रवाढ किती**

अ) रू.५८४२ ब) रू.८३२
ब) रू. १८३२ ड) रू.१९३२

**प्र. ५५. ८८ किमी जाण्यासाठी १२ चाकाचे १००० फेरे पुर्ण होतात तर त्या चाकाची त्रिज्या किती असेल**

अ) १३ मीटर ब) १६ मीटर
ब) १४ मीटर ड) ३० मीटर

**प्र. ५६. १३ X ७ + ५ X ६ + ८ X ९ = ?**

अ) १९२ ब) १९८ ब) १९३ ड) १३४

**प्र. ५७. खालीलपैकी सर्वात मोठा अपुर्णांक कोणता**

अ) ४/११ ब) ७/११ ब) २/११ ड) ७/११

**प्र. ५८. ७.४५ – २.५३ = ?**

अ) ४.८२ ब) ५.९० ब) ४.९२ ड) ५.५८

**प्र. ५९. एका आयाताकृती तलावाची लांबी ३० मीटर असून परिमिती १०० मीटर आहे,तर त्याची रूंदी काढा**

अ) २० मीटर ब) ४० मीटरब) ५० मीटर ड) १० मीटर

**प्र. ६०. दिलेल्या संख्या मालिकेत ८ नंतर १८ किती वेळा येतात.**

**८१८८८१८८१८११८१८१८१८८१८८८८१११८१८१८११८१८८१**

अ) ९ ब) १० ब) ११ ड) यापैकी

**प्र. ६१. रू.८,५०० चे १९.५ टक्के किती**

अ) रू.१५५७.५० पैसे ब) रू.१६५७
ब) रू.१६५८ ड) यापैकी नाही

**प्र. ६२. ०.५७३ + ०.०२१४ +०.०००३५**

अ) ०.०८२२ ब) ०.००६२२
ब) ०.०५९४४३५ ड) ०.५९४४३५

**प्र. ६३.** $१०^{३} + ५^{३} - १२^{३} = ?$

अ) –६२४ ब) –८२४
ब) +२७४ ड) –६०३

**प्र. ६४. १३/१४ मधून काय वजा करावे म्हणजे बाकी ३/४ राहील**

अ) ६/२८ ब) ५/२८ ब) २८/५ ड) ९/२८

**प्र. ६५. खरेदी किंमत रू.२००० विक्री किंमत रू.२४०० तर शेकडा नफा किती**

अ) २४ टक्के ब) २० टक्के ब) २२ टक्के ड) ४० टक्के

**प्र. ६६. जर १६ कामगारांना १०० साड्या विणायला २१ दिवस लागतात तर २०० साड्या १२ दिवसात विणयला किती कामगार लागतील**

अ) ५६ ब) ४२ ब) २८ ड) ६०

**प्र. ६७. एका वर्गातील विद्यार्थी मराठीत २० टक्के नापास झााले इंग्रजीत ३५ टक्के नापास झाले. दोन्ही विषयात १५ टक्के नापास झाले तर पास होणाऱ्यांची संख्या किती टक्के असेल**

अ) ६५ टक्के ब) ७० टक्के ब) ६० टक्के ाड) ३० टक्के

**प्र. ६८. खाालीलपैकी कोणत्या संख्येत ४ या अंकाची स्थानिक किंमत सर्वात जास्त आहे**

अ) ३४०१ ब) ३२४१
ब) ४०१२३ ड) २१४१५

**प्र. ६९. दादासाहेब फाळके पुरस्कार खालीलपैकी कोणत्या क्षेत्राशी संबधित आहे?**

अ) साहित्य ब) शेती ब) चित्रपट ड) क्रिकेट

**प्र.७०.पठाणकोट दहशतवादी हल्ला परतावुन लावण्यासाठी पठाणकोटमध्ये कोणते ऑपरेशन राबविण्यात आले?**

अ) ऑपरेशन ढांगू ब) ऑपरेशन व्हिक्ट्री
ब) ऑपरेशन पठाणकोट ड) यापैकी नाही

**प्र. ७१. रिडल्स इन हिंदूझमचे लेखक कोणत?**

अ) भालचेद्र नेमाडे ब) पंडीत नेहरू
ब) हमीद दलवाई ड)डॉ.बाबासोहब आबेंडकर

**प्र. ७२. होनाजी बाळ हे काय आहेत?**

अ) कवी ब) कथाकार ब) शाहीर ड) भारूड म्हणणारे

**प्र. ७३. भांडयाना कलई करण्यासाठी कोणत्या धातुचा वापर केला जातो?**

अ) चांदी ब) कथील ब) जस्त ड) मँगनीज

**प्र. ७४. भारतातील एकमेव ज्वलामुखी कुठे आहे?**

अ) लक्षदिप ब) पंडीत नेहरू
ब) हमीद दलवाई ड)डॉ.बाबासोहब आबेंडकर

**प्र.७५–अस्पृश्यता निवारणाशी संबंधित भारतीय राज्यघटनेती कोणते कलम आहे?**

अ) १६ ब) १७ क) १८ ड) २१ बँक

**प्र.७६–MCOCA हा कशा संबंधिचा कायदा आहे?**

अ) स्मगलिंग ब) धान्य पुरवठा
क) संघटित गुन्हेगारी ड) पाणी क्रुरता

**प्र.७७–महात्मा जोतिबा फुले यांनी सक्तीच्रा प्राथमिक शिक्षणाची सोय करावी अशी मागणी कोणत्या आयोगासमोर केली?**

अ) सायमन आयोग ब) हंटर आयोग
क) नेहरू आयोग ड) रॅडक्लिफ आयोग

**प्र.७८–खालीलपैकी डिजीटल पेमेंटचा प्रकार नाही?**

अ) भीम ब) युपीआय क) पेटीएम ड) बँकर्स चेक

**प्र.७९–खालीलपैकी अचूक पर्याय निवडा?**

१)ताडोबा–गडचिरोली २)राधानगरी–सातारा
३)मेळघाट–अमरावती ४)पंच–नागपूर

अ) १ व ३ ब)२ व ४ क) ३ व ४ ड)२ व ३

**प्र.८०–योग्य समूहदर्शक शब्द ओळखा? माशांची**

अ)जुबंड ब) गाथन क) गंजी ड) जुडी

**प्र.८१–खालीलैकी वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा–'मुले मैदानावर पळत गेली'**

अ)शक्य क्रियापद ब) अभयविध क्रियापद
क) सयुक्त व सहायक क्रियापद ड)प्रयोजक क्रियापद

**प्र.८२–खालीलैकी वाक्यातील रस ओळख–भ्रान्त तुम्हा का पडे?**

अ)करुणरस ब )अदभुत रस क)विररस ड)हास्यरस

**प्र.८३–खालील वाक्यातील अलंकाराचा प्रकार ओळखा.या दानासी या दानाहुन अन्य असे उपमान ?**

अ)अनन्वय ब)स्वभावोक्ती अलंकार
क)दृष्टांत अलंकार ड)अर्थश्लेष अलंकार

**प्र.८४–अयोग्य जोडी ओळखा.**

अ)विष्णू वामन शिरवाडकर–कुसुमाग्रज
ब)राम गणेश गडकरी–गोंविदाग्रज
क)प्रल्हाद अत्रे–केशवसुत
ड)काशीनाथ हरी मोडक–माधवानुज

**प्र.८५–समास प्रकार ओळखा?–निर्द्रोष**

अ)नत्र तत्पपुरष ब)व्दिगु क)विभर्क्ति तत्पपुरष ड)कर्मधारय समास

**प्र.८६–वाक्यप्रचार ओळखा–मोठ्यांचा आदर राखावा.**

अ)विदयार्थी वाक्य ब)स्वार्थी वाक्य
क)अकरणुरुपी वाक्य ड)मिश्र वाक्य

**प्र.८७–मराठी उपसर्ग लागून तयार झालेला उपसर्गघटित शब्द ओळखा.विपत्ती,अदमास, बदफैल, सरचिटणिस**

अ)विपत्ती ब)अदमास क)बदफैल ड)सरचिटणिस

**प्र.८८–खाली दिलेल्या म्हणीचा समर्पक अर्थ शेधा – इंगळास ओळंबे लागणे.**

अ)कर्तृत्वाला डाग लागणे ब)यशस्वी होणे
क)शिस्तभंग करणे ड)आतुरता वाढणे

**प्र.८९–वाक्यप्रकार ओळखा.– सूर्य मावळला परंतु अंधार पसरला नाही.**

अ)केवल वाक्य ब)मिश्र वाक्य
क)संयुक्त वाक्य ड)अज्ञार्थी वाक्य

**प्र.९०–खालील समानार्थी शब्दांच्या जोडयांपैकी अयोग्य जोडी ओळखा.**

अ)अमृत–सुधा ब)कृपण–विद्रुप
क)गर्व–दर्प ड)अभ्यास – व्यासंग

**प्र.९१–खालील दिलेल्या वाक्यातील प्रयोगाचा प्रकार कोणता?–चोर पोलिसांकडून पकडला जातो.**

अ)कर्म कर्तरी ब)समापन कर्मणी
क)भावे प्रयोग ड)शध्द कर्मणी

**प्र.९२–मरावे परी किर्तीरुपी उरावे. या वाक्यातील उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.**

अ)विकल्प बोधक ब)न्युनत्वबोधक
क)समुच्चयबोधक ड)परिणाम बोधक

**प्र.९३–'खुप धाव घ्यायचीय,पण शरीर बेटं साथ देत नाही' या वाक्यातील अव्याय ओळखा.**

अ)व्यर्थ उदगारवाचक अव्यय ब)पादुपुराणार्थक केवलप्रयोगी
क)केवलप्रयोगी अव्यय ड)वरीलपैकी सर्व

**प्र.९४–आईने मुलाला चालवावे. या वाक्यातील प्रयोग ओळख.**

अ)कर्तरी प्रयोग ब)कर्मणी प्रयोग
क)कर्म–कर्तरी प्रयोग ड)भावे प्रयोग

**प्र.९५–वाक्यप्रयोग ओळखा–जेव्हा अण्णा निवृत्त झाले त्याची उर्दुचा अभ्यास पूर्ण केला.**

अ)केवलवाक्य ब)संयुक्त वाक्य
क)मिश्र वाक्य ड)केवल–मिश्र वाक्य

प्र.९६–समासाचा प्रकार ओळखा.–यथाशक्ती

अ)अव्ययीभाव अलंकार ब)यमक अलंकार
क)श्लेष अलंकार ड)उत्प्रेक्षा अलंकार

**प्र.९७–मित्राच्या उद्याने कोणता आनंद येत नाही.**

अ)अनुप्रास अलंकार ब)यमक अलंकार
क)श्लेष अलंकार ड)उत्प्रेक्षा अलंकार

**प्र.९८– खालील वाक्यातील उपमेय ओळखा–भीमाचे बाहु लोखंडासारखे बलदंड होत.**

अ)भीम ब)बाहु क)बलदंड ड)भीमाचे बाहु

**प्र.९९–ओठ कशाचे,देठचि फुलल्या पारिजातकाचे : या वाक्यातील अलंकार ओळखा.**

अ)व्यतिरेक अलंकार ब)चेतन गुणोक्ती
क)अपन्हुती अलंकार ड)यापैकी नाही

**प्र.१००– खालीपैकी एक डिजीटल पेमेंटचा प्रकार नाही.**

अ)भीम ब)बँकर्स चेक क)पेटीएम ड)युपीआय

## वरील प्रश्नांची उत्तरे

**उत्तरे-** (१) ब (२) क (३) ड (४) अ (५) ड (६)ड (७) अ (८) ड (९) ब (१०) ब (११) * (१२) ब(१३) अ (१४) अ (१५) क (१६) ब (१७) क (१८) ब (१९) ब (२०) अ (२१) क (२२) ब (२३) क (२४) ड(२५) अ (२६) ब (२७) अ (२८) ब (२९) ड (३०) अ (३१) अ (३२) ब (३३) क (३४) क (३५) ब (३६) अ(३७) अ (३८) ब (३९) अ (४०) क (४१) अ (४२) अ (४३) ड (४४) ब (४५) ब (४६) क (४७) ब (४८) ड(४९) अ(५०) ड (५१) क (५२) ड (५३) अ (५४) ब (५५) क (५६) क (५७) ड (५८) क (५९) अ (६०) ब(६१) ड (६२) ड (६३) ड (६४) ब (६५) ब (६६) अ (६७) क (६८) क (६९) क (७०) अ (७१) ड (७२) क(७३) ब (७४) ब (७५) ब (७६) क (७७) ब (७८) ड (७९) क (८०) ब (८१) क (८२) क (८३) अ (८४) क(८५) अ (८६) अ (८७) ब (८८) अ (८९) क (९०) ब (९१) अ (९२) ब (९३) अ (९४) ड (९५) क (९६) अ(९७) क (९८) ड (९९) क (१००) ब

# राज्यसेवा (मुख्य)परीक्षा २०१२ सामान्य सराव पेपर

**प्र.१– सरकारने सार्वजनिक खाजगी भागीदारी धोरण, या हेतूने स्वीकारले आहे.**

(अ) सार्वजनिक क्षेत्रातील पायाभूत सेवासुविधा उभारणीसाठी खाजगीभांडवल आकर्चित करणे.

(ब) सार्वजनिक क्षेत्रातील ग्राहक उपयुक्त सेवाची कार्यक्षमता सुधारणे.

(क) सार्वजनिक क्षेत्राद्वारे अधिक नफा मिळविने.

(ड)शेतकऱ्यांना पिक विममा योजना उपलब्ध करणे.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

१) फक्त(अ) २) (अ) आणि (ब) ३) (अ) ,(ब) आणि(क) ४) (अ) ,(ब) आणि (ड)

**प्र.२– राष्ट्रीय कृषी सहकार विपणन संघाने (नाफेड) या हेतुने महत्वाची भूमिका पार पाडलेली आहे.**

(अ) राज्यांतर्गत शेती उत्पादन व निर्यात व्यापारास चालना देणे.

(ब) डाळी आणि तेलबिया उत्पादनास किमान आधारभुत किंमतीची हमी देणे.

(क) बागायती उत्पादनाच्या बाजारायंत्रनेत हस्तक्षेप करणे.

(ड)सार्वजनिक पायाभूत सेवा सुविधांसाठी सहकार सहभागास उद्यूत करणे.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

१) फक्त(अ) २) (अ) आणि (ब) ३) (अ) ,(ब) आणि(क)४) (अ) ,(ब) आणि (ड)

**प्र.३ – भारतात ऊर्जा समस्या कशामुळे निर्माण झाली आहे.**

(अ) तेलाचा मागणी पुरवठा असमतोल.

(ब)वीजशक्तीची कमतरता.

(क)कोळशाची कमतरता. (ड)पाणी टंचाई.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

१) फक्त (अ) २)(अ) आणि (ब) ३)(अ) ,(ब) आणि(क) ४) (अ) ,(ब) आणि (ड)

**प्र.४–खालील विधाने किसान क्रेडिट कार्ड योजेनबद्दल आहेत.**

(अ) या योजनेखाली शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारची कर्जे दिली जातात.

(ब)ही योजना रोख कर्जाची सुविधा देते ज्यात कितीही वेळा रक्कम काढता येते.

(क)ही योजना अल्पमुदत कर्जे, खेळते भांडवल आणि दीर्घ मुदत कर्जे पुरवते.

(ड)किसान क्रेडिट कार्ड धारकांना अपघात विमा संरक्षण दिले जाते.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

१) (अ), (ब) आणि (क) २)(ब) आणि (क)
३)(अ) ,(क) आणि(ड) ४)(ब) ,(क) आणि (ड)

**प्र.५ – जागतिक व्यापार संघटनेची स्थापना या हेतूने १९१५ मध्ये करण्यात आली.**

(अ) बिगर भेदभावाचे तत्त्व अंगीकारणे.

(ब)मुक्त व्यापाराचे धोरण स्वीकारणे.

(क) आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारणे.

(ड)गॅटचे धोरण स्वीकारणे.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

१) फक्त (अ) २)(अ) आणि (ब)
३)(अ) ,(ब) आणि(क) ४)(अ) ,(ब) आणि (ड)

**प्र.६ – बहुराष्ट्रीय कंपन्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील हानिकारक परिणाम कोणते?**

(अ) आर्थिक रचनेत बिघाड.

(ब)पैशाचा प्रवाह देशाबाहेर.

(क) राजकीय हस्तक्षेप.

(ड)परकीय गुंतवणुकीस हानिकारक.

दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा:

१) (अ) आणि (ब) २)(अ),(ब) आणि (क)
३)(ब) ,(क) आणि(ड) ४)वरील सर्व

**प्र.७ – जननी सुरक्षा योजनेचे मुख्य उद्दिष्ट काय आहे?**

१) प्रसुतीकाळातील मृत्यू आणि नवजात बालकांचे मृत्यू रोखणे.

२) जन्मदर कमी करणे.

३) मातांची काळजी घेणे. ४) नवजात बालकांचे मृत्यूदर रोखणे.

**प्र.८ –लघुउद्योगांच्या निर्यात प्रोत्साहनास पाठिंबा म्हणून खालीलपैकी कशाची स्थापना केली गेली?**

१) तांत्रिक विकास रोल. २) राष्ट्रीय लघुउद्योग महामंडळ

३) लघुउद्योग विकास संघटन ४) खादी आणि ग्रामोद्योग महामंडळ

**प्र.९–भारत सरकारने १९९१ चे औद्योगिक धोरण लघुउद्योगांसाठी या हेतूने जाहीर केले.**

(अ) लघुउद्योगांना बळकट आणि सशक्त करणे.

(ब) पतपुरवठ्याची हमी देणे.

(क) कच्चा माल पुरविणे.

(ड)विक्रि झालेल्या वस्तुंची देय रक्कमेची हमी देणे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहेत?

१) फक्त(अ) २)(अ) आणि (ब)
३) (ब) ,(क) आणि(क) ३) (ब) ,(क) आणि (ड)

**प्र.१०– महाराष्ट्रातील सहकारी संस्था खालीलपैकी कोणत्या वस्तूंच्या विक्रिसाठी प्रसिध्द आहेत?**

१) कापूस २) तंबाखू ३) फळे व भाज्या ४) वरील सर्व

**प्र.११– १९५१ पासून भारताच्या परकीय व्यापारात या हेतूने बदल झाला आहे.**

(अ)औद्योगिकीकरणात जलद गतीने वाढ होणे.

(ब) अन्नधान्य आणि उपभोग्य वस्तुंच्या आयातीमध्ये घट होणे.

(क) कच्चा मालाच्या आयातीत घट होणे.

(ड)भारतीय उत्पादीत वस्तुंच्या निर्यातीस सहाय्यभूत होण्याकरता रचना बदलणे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहेत?

१) फक्त(अ) २)(अ) आणि (ब)
३) (अ) ,(ब) आणि(क) ४) (अ) ,(ब) आणि (ड)

**प्र.१२– सहकारी विपणन संस्थांनी या हेतूने महत्वाची भूमिका पार पाडली आहे.**

(अ)शेती उत्पादनाच्या किंमती स्थीर करण्यासाठी मदत करणे.

(ब) सभासदांना गोदामाच्या सुविधा पुरविणे.

(क) गैरव्यवहारापासून सभासदांचे संरक्षण करणे.

(ड)शेतकऱ्यांना दीर्घकालीन कर्जपुरवठा करणे.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

१) फक्त(अ) २)(अ) आणि (ब)
३) (अ) ,(ब) आणि(क) ४) (अ) ,(ब) आणि (ड)

**प्र.१३– खालीलपैकी कोणती वर्षे सहकार कायद्यांशी संबंधीत आहे?**

(अ) १९०२ (ब) १९०३ (क) १९०४ (ड) १९१२

योग्य पर्याय निवडा.

१) (अ) आणि (ब) २)(ब) आणि (क)
३) (क) आणि(ड) ४) (ड) आणि (अ)

**प्र.१४– जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत खालील घटकांचा समावेश होतो.**

(अ) आंतराष्ट्रीशकरण. (ब)खाजगीकरण.
(क)शिथिलीकरणा. (ड)विकेंद्रीकरण.

योग्य पर्याय निवडा.

१) (अ) आणि (ड) २)(अ) आणि (क)
३) (ब) आणि(क) ४) (क) आणि (ड)

**प्र.१५– जागतिकीकरणाची साधने कोणती?**

(अ) तंत्रघज्ञान (ब)माहितीचे प्रसारण
(क)निर्गुंतवणूक (ड)बहुराष्ट्रीय कंपन्या

योग्य पर्याय निवडा.

१) फक्त(अ) २)(अ),(ब) आणि (क)
३) (अ), (ब) आणि(ड) ४) (अ) आणि (ड)

**प्र.१६– गॅट (GATT)मधील 'सामाजिक परिच्छेद'(social clause)खालील घटकाशी निगडीत होता?**

१) विदेशी व्यापाराचा विस्तार.

२)विकसनशील देशातून होणाऱ्या आयातीवर कर आकारणी.

३) नियंत्रणे व निर्बंध कमी करणे. ४)आधुनिक तंत्रज्ञनाचा उपयोग करणे.

**प्र.१७– भारताच्या परकीय व्यापाराच्या दिशेच्या संदर्भात खलीलपैकी कोणते विधान समर्पक आहे?**

१)OECDदेशांचे भारतीय निर्यातीतील महत्त्व वाढले आहे.

२)भारताचाOPEC प्रदेशाशी व्यापार मोठ्या प्रमाणात सुधारला आहे.

३) भारताच्या निर्यातीत इंग्लंडचे स्थान प्रथम आहे.

४)SARRCप्रदेशांतून आयात मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

**प्र.१८– भारताच्या दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये खालील लक्ष्य निश्चित केलेले नव्हते?**

१)दारिद्र्यात घट २)सहकारास प्रोत्साहन
३)वृध्दी दर व रोजगारात वाढ ४)प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण

**प्र.१९– रस्ते विकासातील मोठ्या समस्या कोणत्या?**

(अ)वृध्दीची संथ गती (ब) असमान वितरण
(क) निकृष्ट दर्जा (ड)वाहनाची कमी संख्या

योग्य पर्याय निवडा.

१) फक्त(अ) २)(अ)आणि(ब)
३)(अ),(बआणि(क) ४)(अ),(ब)आणि (ड)

**प्र.२०– विशेष आर्थिक क्षेत्र कायदा २००५ हा या हेतून करण्यात आला.**

(अ)आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविणे आणि परकीय चलन मिळविणे

(ब)परकीय गुंतवणूक आकर्षित करणे.

(क) वायाभूत सेवा सुविधा निर्माण करणे.

(ड)परकीय विनिमय दर निश्चित करणे.

योग्य पर्याय निवडा.

१) फक्त(अ) २)(अ)आणि(ब)
३)(अ),(ब)आणि(क) ४)(अ),(ब)आणि (ड)

**प्र.२१– शेतमालाचा आंतरराज्यीय आणि निर्यात व्यापार वाढवण्यासाठी कोणती शिखर सहकारी संस्था स्थापन करण्यात आली?**

१)TRIFED २)NCDC
३)AGMARK ४) वरीलपैकी कोणतही नाही.

**प्र.२२– भारतीय आर्थिक सुधारणांनंतर एम.आर.टी.पी.–– कायद्याची जागा कोणत्या कायद्याने घेतली?**

१)एफ.इ.एम.ए. (FEMA)

२)कंपनीज ॲक्ट (Companies Act)

३)फॅक्टरीज ॲक्ट (Factories Act)

४) वरीलपैकी एकही नाही.

**प्र.२३– भारत सरकारने १९९१ मध्ये नवीन औद्योगिक धोरण कोणत्या हेतूने स्वीकारले.**

(अ) तोट्यात आलेल्या उद्योगांचे खाजगीक्षेत्राकडे हस्तांतरण

(ब)प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीस चालना देणे.

(क)सार्वजनिक क्षेत्राची गुणवत्ता वाढविणे.

(ड)परवाना पध्दतीवर नियंत्रण ठेवणे.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

१) फक्त(अ) २)(अ) आणि (ब)
३)(अ) ,(ब ) आणि(क) ४)(अ),(ब)आणि(ड)

**प्र.२४– जागतिकीकरणाच्या काळात भारताची रोजगाराची स्थिती कशामुळे वाईट झाली आहे?**

(अ) रोजगार वृध्दीदरात घट होत आहे.

(ब)कृषी क्षत्रातील नकारात्मक रोजगार वृध्दीदर.

(क)सार्वजनिक क्षेत्रातील नकारात्मक रोजगार वृध्दीदर.

(ड)सहकार क्षेत्रातील रोजगार वृध्दीदर कमी होणे.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

१) फक्त(अ) २)(अ) आणि (ब)
३)(अ) ,(ब ) आणि(क) ४)(अ),(ब)आणि(ड)

**प्र.२५– १९९८ चा विदेशी विनिमय व्यवस्थापन कायदा या हेतूने करण्यात आला.**

(अ) फेरा (FERA) कायद्यात बदल करणे.

(ब)परकीय विनिमय व्यवस्थापन आणि विनिमय सुरक्षितता यावर भर देणे.

(क)भारतीय अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण करणे.

**प्र.२६– पत प्रमाणित करणाऱ्या संस्थांनुसार गुंतवणुकीचा सर्वाधिक दर्जा कोणता आहे?**

१) AAAA २) AAA
३)AA ४) A

**प्र.२७– भारताच्या विकासासंदर्भात डॉ.कलाम यांनी स्विकारलेल्या प्रतिमानात खालील घटकांचा समावेश होता.**

१)भौतिक,इलेक्ट्रोनिक,ज्ञान व आर्थिक जोडणी

२)खाजगी क्षेत्रावर नियंत्रण

३) दारिद्र्याचे निवारण ४)शेती क्षेत्राचा विकास

**प्र.२८– सार्वजनिक क्षेत्रातील तीन महत्त्वाच्या वित्तीय संस्था मागासलेल्या भागात सुरू झालेल्याा प्रकल्पांना सवलतीच्या दराने वित्तपुरवठा करतात.**

१)आर.बी.आय., एस.बी.आय., एल.आय.सी.

२)आय.डी.बी.आय.,आय.सी.आय.सी.आय.,आय.एफ़सी.आय.

३) नाबार्ड, आर.आर.बी., आय.डी.बी.आय.

४)आय.एफ़सी.आय., आर.बी.आय., आय.सी.आय.सी.आय.

**प्र.२९– भारत सरकारने ग्रामीण विद्युतीकरणाचे धोरण मध्ये या उद्देशाने जाहीर केले.**

(अ) सर्व कुटुंबधारकांना विजेचा पुरवठा करणे.

(ब) दर्जेदार आणि विश्‍वसनीय वीजपुरवठा किफ़ायशीर दराने उपलब्द करणे.

(क)वीजपुरवठयावर नियंत्रण ठेवणे.(ड)विजेचा किमान वापर करणे.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

१) फक्त (अ) २)(अ) आणि (ब)
३)(अ) ,(ब) आणि(क) ४)(अ) ,(ब) आणि (ड)

**प्र.३०– 'बांधा चालवा आणि हस्तांतरित करा' शी (BOT) संबंधीत कायदा कोणता?**

१)राज्य महामार्ग कायदा १९९४ २) BOT कायदा१९९३
३)राष्ट्रीय महामार्ग कायदा१९९५ ४) खाजगीकरण कायदा १९९१

**प्र.३१– मौद्रिक धोरणाची उद्दिष्टे कोणती आहेत?**

(अ)पैशाची तटस्थता,किंमत स्थिरीकरण,विनिमय स्थिरीकरण

(ब) पूर्ण रोजगार, आर्थिक वृध्दी

(क)पायाभूत विकास (ड)शिक्षण आणि आरोग्यातील सुधारणा

योग्य पर्याय निवडा.

१) (अ)आणि(ब) २)(अ),(ब)आणि (क)
३)फक्त(क) ४)(क)आणि(ड)

**प्र.३२– खाजगीकरण व जागतिकीकरण धोरण कोणत्या प्रधानमंत्र्याने जाहीर केले?**

१)चंद्रशेखर २)पी.व्ही.नरसिंह राव
३) डॉ.मनमोहन सिंग ४)एच.डी.देवगौड

**प्र.३३– फिशरच्या चलनयंख्यामान सिध्दांतानुसार पैशाचे मुल्य आणि पैशाची यंख्या यामधील संबंध कसा आहे?**

१)इतर परिस्थिती स्थिर असता पैशाचे मुल्य त्याच्या संख्येच्या विरुध्द दिशेने बदलते.

२)इतर परिस्थिती स्थिर असता पैशाचे मुल्य त्याच्या संख्येच्या सम दिशेने बदलते.

३)पैशाची संख्या आणि पैशाचे मुल्य याच्यातील सहसंबंध प्रमाणशीर आहे.

४)वरीलपैकी नाही.

**प्र.३४– व्यवसाय कराबाबत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?**

१)व्यवसाय कराची कमाल मर्यादा २५० वरून २५०० पर्यंत वाढविण्यात आली आहे.

२)ही वित्तीय मर्यादा वाढविण्यासाठी घटनादुरूस्ती आवश्यकता असते.

३) हा कर लावण्यासाची व वसुल करण्याचे अधिकार कोणत्याही परिस्थितीत स्थानिक प्राधिकरणाकडे सोपविता येत नाही.

४)व्यवसाय कर हा प्राप्ती कराचा एक भाग आहे या कारणावरून याबाबतचा राज्य कायदा असंवैधानिक ठरत नाही.

**प्र.३५–देशातील पत निर्मिती नियंत्रित करण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून खालीलपैकी कोणता उपाय योजला जातो?**

१)खुल्या बाजारातून रोख्यांची खरेदी करणे.

२) खुल्या बाजारात रोख्यांची विक्री करणे.

३) रोख राखीव निधीचे प्रमाण कमी करणे.

४) बँक दर कमी करणे.

**प्र.३६–भारतातील लघुउद्योगांची प्रमुख समस्या कोणती आहे?**

१)कच्चा मालाचा अभाव. २)अपुऱ्या पायाभूत सुविधा.
३) आधुनिकीकरण. ४) कामगारांची अनुपलब्धता.

**प्र.३७–सहकारी क्षेत्राचे प्रमुख उदिष्ट कोणते?**

१)उद्योगांना वित्तीय मदत पुरविणे.

२)आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या कल्याणाचे महत्तमीकरण करणे.

३) शेतीला पतपुरठा करणे. ४) ग्राहकांना हितसंबंध जोपासणे.

**प्र.३८– मध्यवर्ती बँक सदस्य बँकांना ज्या दराने कर्ज देते त्या दरास काय म्हणतात?**

१)व्याज दर २)बँक दर
३) रेपो दर ४)अधिकर्ष सवलत

**प्र.३९– संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ''सहस्त्रकातील विकासाचे उद्दिष्ट'' या अंतर्गत कोणत्या वर्षापर्यंत भुकेचा प्रभााव निम्यावर आणण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले ?**

१)वर्ष२०५० २)वर्ष२०३० ३)वर्ष२०२० ४)वर्ष२०१५

**प्र.४०– ग्रामीण लोकांना संघटित करून त्यांची वित्तीय क्षमता वाढविण्यास व बँकांकडून व्यावसायिक कर्ज घेण्यास सक्षम करण्यास कोणता कार्यक्रम आखला गेला असहे?**

१)महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (एमजीनरेगा)

२)स्वयंसहाय्यता बचत गट (एसएचजी)

३)स्वर्णजंयती ग्राम स्वरोजगार याजना (एसजीएसवाय)

४) वीस कलमी कार्यक्रम(टीपीपी)

**प्र.४१– देशातील ग्रामीण व शहरी दोन्ही भागात खालीलपैकी योजनेचा विस्तार करण्यात आला?**

१)जवाहर रोजगार योजना २)नेहरू रोजगार योजना
३)जे.पी.नारायण रोजगार गॅरन्टी योजना ४) प्रधान मंत्री रोजगार योजना

**प्र.४२–महाराष्ट्र राज्य सहकारी बँका कोणत्या अधिनिमाव्दारे नियंत्रित केली जाते?**

१) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम १९३४

२)भारतीय कंपनी अधिनियम १९५६

३) बँकींग रेग्यूलेशनअधिनियम ४)वरीलपैकी एकही नाही

**प्र.४३–किमान आधारभूत 'किंमत' म्हणजे.....**

१) ज्या किंमतीला सरकार उत्पादित करते.

२) ज्या किंमतीला सरकार खरेदी करते.

३) ज्या किंमतीला सरकार खुल्या बाजारात विक्री करते.

४) ज्या किंमतीला सरकार नियंत्रित प्रणालीव्दारे विकते.

**प्र.४४–भारतीय चलनाचे हे नवीन चिन्ह कोणत्या वर्षी स्वीकारण्यात आले?**

१)२००९ २)२०१० ३) २०११ ४)२००८

**प्र.४५–खालीलपैकी कोणत्या समूहावर चलनवाढीचा प्रतिकूल परिणाम होतो?**

(अ) असंघटित क्षेत्रातील मजूरी करणारे.

(ब) लाभधारक.

(क) वेतनधारी चलनवाढीनुसार वेतन निर्देशांक असणारे.

(ड)निश्चित निवृत्ती वेतन मिळविणारे निवृत्तीयधारक.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

१) (अ) आणि (ब) २)(क) आणि (ड)
३)(ब) आणि (क) ४)(अ) आणि (ड)

**प्र.४६–कोणत्याही अर्थव्यवस्थेत व्यापारचक्र ज्या अवस्थेतून जाते तीचा योग्य अनुक्रम कोणता?**

१)मंदी–मुद्रास्फिती–पुनरुत्थान–घसरण

२) घसरण–पुनरुत्थान–मुद्रास्फिती–मंदी

३)मंदी–पुनरुत्थान–मुद्रास्फिती–घसरण

४)मुद्रास्फिती–मंदी–घसरण–पुनरुत्थान

**प्र.४७–मंदीच्या काळात खालीलपैकी कोणते राज्यकोषीय धोरण अधिक यशस्वी ठरेल?**

१)करामध्ये वाढ आणि सार्वजनिक खर्चात कपात.

२) करामध्ये वाढ आणि सार्वजनिक खर्चात वाढ.

३) करामध्ये कपात आणि सार्वजनिक खर्चात कपात.

४)करामध्ये कपात आणि सार्वजनिक खर्चात वाढ.

**प्र.४८–नरसिंहम समिती कशासाठी प्रसिध्द आहे?**

१) आर्थिक सुरणांसाठी

२) बँक पुनर्रनचेबाबतच्या शिफारसीसंबंधी

३) प्रत्यक्ष करात सुधारणा ४) अप्रत्यक्ष करात सुधारणा

**प्र.४९–मुद्रास्फितीच्या वाढीचा सरकारच्या कर वसुलीवर कसा प्रभााव पडतो ?**

१) कर वसूली वाढते. २) कर वसूली घटते.

३)करवसूली अप्रभावित राहते.४)करवसूली पहिलेवाढते आणि नंतर घटते.

**प्र.५०–विजय केळकर समितीचा अहवाल कशाशी संबंधित आहे?**

१)वित्तीस क्षेत्रात सुधारणा.२)प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करात सुधारणा.

३) प्रशासकीय सुधारणा. ४) व्यापार सुधारणा.

**प्र.५१–एकूण खर्च –(प्राप्ती+घ्यावयाची रक्कम+सार्वजनिक मालमत्तेची विक्री)=**

१) राजकोषीय तूट २)अंदाजपत्रकीय तूट
३)प्राप्ती तूट ४) प्राथमिक तूट

**प्र.५२–कोणत्या कारणासाठी बौध्दिक संपदा अधिाकार विकसित करण्यात आला आहे?**

१) राष्ट्रीय हिताचे संरक्षण. २) जागरूकता निर्माण करणे.
३)आंतरराष्ट्रीय दायित्वाची पूर्णता. ४) वरील सर्व.

**प्र.५३–भारतामध्ये 'विशेष आर्थिक क्षेत्र'(सेझ) मोठ्या प्रमाणात कोणत्या व्यवसायासाठी लागू करण्यात आले?**

१)ऑटोमोबाईल क्षेत्र २) उत्पादन क्षेत्र
३)माहिती तंत्रज्ञान क्षेत्र ४)शक्ती संसाधन क्षेत्र

**प्र.५४–खालीलपैकी कोणते उद्योग भारताचे आधारभूत उद्योग नाही?**

१)कोळसा,कच्चे तेल आणि विद्युत

२) तेल परिशोधन,कच्चे तेल आणि कोळसा

३) कोळसा,सिमेंन्ट आणि लोह–इस्पात

४) कच्चे तेल,प्राकृतिक गॅस आणि तेल परिशोधन

**प्र.५५–लोसंख्येत घट झाल्यास काय होईल?**

१)दरडोई उत्पादन घट २)गुंतवणुकीत वाढ
३) दरडोई उत्पादनात वाढ ४)बचतीत वाढ

**प्र.५६–२००३ पर्यंत महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण विकास बँक हे कोणत्या बँकेचे नाव होते?**

१)भूतारण बँक २) प्राथमिक सहकारी संस्था
३) भूविकास बँक ४)वरीलपैकी नाही

**प्र.५७–१९९६–९७ मध्ये नियोजन मंडळाने व्यक्त केलेल्या** दारिद्र्याच्या **अंदाजासाठी कोणता निकष वापला होता?**

१) ग्रामीण भागासाठी दरमहा –– १२२.६० उपभोग खर्च आणि शहरी भागासाठी–– १५८.३०प्रत्येक महिन्याला

२) ग्रामीण भागासाठी दरमहा––१६०.३० उपभोग खर्च आणि शहरी भागासाठी––१६५.२०प्रत्येक महिन्याला

३) ग्रामीण भागासाठी दरमहा––१६५.४५ उपभोग खर्च आणि शहरी भागासाठी––१४८.३०प्रत्येक महिन्याला

४) ग्रामीण भागासाठी दरमहा––१७५.५५ उपभोग खर्च आणि शहरी भागासाठी––१८५.२०प्रत्येक महिन्याला

**प्र.५८–भारतातील ग्रामीण** दारिद्र्य **दूर करण्यासाठी कोणता कार्यक्रम जाहीर करण्यात आला?**

१)वीस कलमी कार्यक्रम २)किमान गरजा कार्यक्रम
३) एकत्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम ४)वरील सर्व

**प्र.५९–भारताच्या सन २००० च्या लोसंख्याविषयीक धो–रणाचे दीर्घकालीन उद्दिष्ट काय आहे?**

१)सन२०२०पर्यंत किमान जन्मदर साध्य करणे.

२) सन२०३०पर्यंत सुदृढ लोकसंख्या साध्य करणे.

३) सन२०४०पर्यंत स्त्री–पुरूष प्रमाणात वाढ करणे.

४) सन२०४५पर्यंत स्थिर लोसंख्या साध्य करणे.

**प्र.६०–स्त्री सक्षमीकरण म्हणजे काय ?**

१)स्त्रीयांची सामाजिक–आर्थिक स्थिती सुधारणे.

२) स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण सुधारणे.

३) स्त्रीयाना रोजगार संधी पुरविणे.

४) स्त्रीयांचा आर्थिक सहभाग वाढविणे.

**प्र.६१–१९८० च्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट काय होते?**

१) ग्रामीण युवकांना स्वयं रोजगारांसाठी बीज भांडवलाचा पुरवठा करणे.

२) ग्रामीण युवकांना स्वयं रोजगारांसाठी प्रशिक्षणाच्या सुविधा पुरविणे.

३) ग्रामीण भारतातील गरीब लोकांना रोजगाराच्या संधी पुरविणे.

४)सुशिक्षित बेरोजगारांना तांत्रिक मदत पुरविणे.

**प्र.६२–महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रांच्या आजारपणाचे मूलभूत कारण कोणते?**

(अ)भांडवलाचा अभाव,अपुरा उर्जेचा पुरवठा,आधुनिक तंत्रज्ञानाचा अल्प वापर

(ब)पायाभूत सुविधांचा अभाव,कुशल मजूरांचा अभाव

(क)उद्योगांचे विकेंद्रीकरण (ड)वाढती स्पर्धा

योग्य पर्याय निवडा.

१) फक्त(अ) २)(अ) आणि (ब)
३)(अ) ,(ब ) आणि(क) ४)(क) आणि (ड)

**प्र.६३–अकराव्या पंचवार्षिक योजनेत** दारिद्र्य **रेषेखालील व्यंक्तींचे प्रमाण कमी करण्याबाबत निश्चित करण्यात आलेले उद्दिष्ट होते?**

१) दर वर्षी १ टक्क्याप्रमाणे पंचवार्षिक योजनेच्या काळात ५%

२) दर वर्षी २ टक्क्याप्रमाणे पंचवार्षिक योजनेच्या काळात १०%

३)पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षाच्या काळात प्रत्येकी,१% नंतरच्या तीन वर्षांच्या २%काळात या प्रमाणे एकूण १०%

४) वरीलपैकी कोणतेही नाही.

**प्र.६४–दुष्काळ व्यवस्थापनासाठी महाराष्ट्र कोणत्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली?**

१) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम २)ट्रायसेम
३) सर्वंकष पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम ४)रोजगार हमी योजना

**प्र.६५–महाराष्ट्रातील भारनीयमाचे प्रमुख कारण काय आहे?**

१)वाढती मागणी आणि अपुरी निर्मिती २)योग्य व्यवस्थापनाचा अभाव
३) पारेशातील गळती ४)चुकीचे सरकारी धोरण

**प्र.६६–UNDP च्या२०११च्या मानव विकास अहवालामध्ये बहुअंगी** दारिद्र्य **निर्देशांकाचे मापन खालील देशांसाठी केलेले आहे.**

१)भारत २)कोलंबिया ३) केनिया ४)नायजेरिया

वरीलपैकी कोणत्या देशांसाठी मापन केलेले आहे?

१) (अ),(ब)आणि(क) २)(ब),(क)आणि(ड)
३)(अ),(क)आणि(ड) ४)(अ),(ब)आणि (ड)

**प्र.६७–भारतात अंतर्गत मत्स्योत्पादनाची कोणती साधने आहेत?**

(अ)नद्या (ब)कॅनॉल (क)मोठी धरणे (ड)विहिरी

योग्य पर्याय निवडा

१) फक्त (अ) २)(अ) आणि (ब)
३)(अ) ,(ब) आणि(क) ४)(अ) ,(ब) आणि (ड)

संक्षिप्त

## अभियांत्रिकी परीक्षेत गैरप्रकार



नौकरी एक्सप्रकस

पुणे /प्रतिनिधी/ नापास होण्याची भीती वाटणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्राध्यापकाने पैसे घेऊन त्यांच्याकडून रात्री प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्याचा धक्कादायक प्रकार वाघोली येथील पार्वतीबाई गेनबा मोझे अभियांत्रिकी महाविद्यालयात घडला. कॉलेजमध्ये दुपारी परीक्षा झाल्यानंतर हा प्राध्यापक विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी दहा ते पन्नास हजार रुपये घेऊन रात्री त्यांना ती प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी देत होता. या प्राध्यापकासह तीन विद्यार्थ्यांना पुणे पोलिसांनी अटक केली आहे.

अभियांत्रिकी परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या या टोळीचा गुन्हे शाखेच्या युनिट सहाच्या पथकाने पर्दाफाश केला आहे. आरोपी प्राध्यापक व विद्यार्थ्यांकडून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'इंजिनिअरिंग मॅथेमॅटिक्स-२' विषयाच्या उत्तरपत्रिकेचे सहा बंडल, दोन लाख सहा हजार रुपयांची रोकड, उत्तरपत्रिका ठेवलेल्या कक्षाची चावी जप्त करण्यात आली आहे.

प्राध्यापक प्रतीक किसन सातव (वय ३७, रा. प्रेमकुंज सोसायटी, केसनंद, वाघोली), आदित्य यशवंत खिलारे (वय २०, मूळ रा. रांजणीवळती, ता. आंबेगाव, जि. पुणे, सध्या रा. वाघोली), अमोल अशोक नागरगोजे (वय १९, मूळ रा. रोहतवाडी, पाटोदा, सध्या रा. वाघोली), अनिकेत शिवाजी रोडे (वय २०, मूळ रा. नान्नज, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर, सध्या रा. वाघोली) अशी अटक आरोपींची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध भारतीय न्यायसंहितेच्या कलमांसह सह सार्वजनिक परीक्षा (आयोग साधनांचे प्रतिबंध) कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत, पोलिस शिपाई शेखर काटे यांनी वाघोली पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

मोठी रक्कम घेतली -

वाघोलीतील बायफ रस्त्यावर असलेल्या पार्वतीबाई गेनबा मोझे अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक प्रतीक सातव हा सोमवारी दुपारी झालेल्या अभियांत्रिकी शाखेच्या पहिल्या वर्षातील 'इंजिनिअरिंग मॅथेमॅटिक्स- २' ही प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांकडून रात्री सोडवून घेणार आहे. त्यासाठी सातव याने विद्यार्थ्यांकडून मोठी रक्कम घेतली आहे, अशी माहिती गुन्हे शाखेच्या युनिट सहाचे सहायक निरीक्षक मदन कांबळे यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने रात्री छापा टाकला. त्या वेळी अभियांत्रिकी शाखेच्या प्रथम वर्षातील आठ विद्यार्थ्यांकडून प्रश्नपत्रिका सोडवून घेण्यात येत असल्याचे आढळून आले.

बनावट चावी तयार केली -

या प्रकरणातील मुख्य आरोपी प्राध्यापक प्रतीक सातव आणि त्याच्या साथीदारांनी नापास होण्याची धास्ती असलेल्या विद्यार्थ्यांना हेरले. त्यांच्याकडून प्रत्येकी दहा ते पन्नास हजार रुपये घेतले. महाविद्यालयातील परीक्षा नियंत्रण कक्षाची बनावट चावी तयार करून घेतली. या चावीचा वापर करुन 'इंजिनिअरिंग मॅथेमॅटिक्स-२' विषयाच्या उत्तरपत्रिकांचे सहा सीलबंद बंडल काढून घेतले. विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिका काढून घेतल्या. उत्तरपत्रिका पुन्हा लिहिण्यासाठी दिल्या. या प्रकरणात अटक केलेले आरोपी आदित्य खिलारे, अमोल नागरगोजे, अनिकेत रोडे हे अभियांत्रिकी शाखेत दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहेत. नागरगोजे आणि खिलारे अभियांत्रिकी महाविद्यालयात रात्रपाळीत सुरक्षारक्षक म्हणून काम करतात, अशी माहिती वरिष्ठ निरीक्षक वाहिद पठाण यांनी दिली.

सत्यशोधन समितीची स्थापना -

या प्रकरणी विद्यापीठ प्रशासनाने महाविद्यालयात घडलेल्या घटनेची चौकशी करण्यासाठी सत्यशोधन समितीची स्थापना केली आहे. याबाबत विद्यापीठाने पुढील सात दिवसांत अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त् यामुळे समितीकडून झालेल् या सर्व गैरप्रकाराची चौकशी होणार आहे.

# RRB , NTPC परीक्षेत विचारले जातील २२० प्रश्न, कसा असणार परीक्षा नमुना?

आरआरबी एनटीपीसी (RRB NTPC) पदवीपूर्व स्तरावरील परीक्षा ५ जून ते २४ जून २०२५ दरम्यान होणार आहे. रेल्वे भरती मंडळाने आरआरबी एनटीपीसी प्रवेशपत्र २०२५ जारी केले आहे.आरआरबी एनटीपीसी प्रवेशपत्र २०२५ हे rrbcdg.gov.in किंवा इतर प्रादेशिक आरआरबी वेबसाइटवरून डाउनलोड करता येते. आरआरबी एनटीपीसी परीक्षा २०२५ पूर्वी, त्याचा एग्जाम पैटर्न आणि मार्किंग स्कीम समजून घेणे खूप महत्वाचे आहे.

रेल्वे रिक्रूटमेंट बोर्ड RRB NTPC (नॉन-टेक्निकल पॉप्युलर कॅटेगरी) अंडरग्रेजुएट लेव्हल (लेव्हल २ आणि ३) परीक्षा उत्तीर्ण होऊन तुम्ही सरकारी नोकरी मिळवू शकता. RRB NTPC ॲडमिट कार्ड २०२५ डाउनलोड करण्यासाठी नोंदणी क्रमांक आणि जन्मतारीख आवश्यक असेल. RRB हॉल तिकिटावर परीक्षेची तारीख, वेळ, परीक्षा केंद्राचा पत्ता आणि महत्त्वाच्या सूचना असतात. ठठइ ने उमेदवारांना ॲडमिट कार्डची प्रिंटआउट घेऊन वेळेवर परीक्षा केंद्रावर पोहोचण्याचा सल्ला दिला आहे.

RRB NTPC पदवीपूर्व स्तरावरील भरती प्रक्रियेत खालील टप्पे असतात:

पहिला टप्पा CBT (संगणक आधारित चाचणी): स्क्रीनिंग राउंड.

दुसरा टप्पा CBT: गुणवत्तेवर आधारित राउंड.

टायपिंग स्किल टेस्ट (TST): काही पदांसाठी (जसे की ज्युनियर क्लर्क कम टायपिस्ट, अकाउंट्स क्लर्क कम टायपिस्ट).

कागदपत्रांची पडताळणी आणि वैद्यकीय तपासणी: अंतिम निवडीसाठी.

टीप: स्टेशन मास्टर आणि ट्रॅफिक असिस्टंट सारख्या पदांसाठी संगणक आधारित अभियोग्यता चाचणी (CBAT) लागू नाही कारण ही पदे पदवीधर पातळीसाठी (स्तर ५ आणि ६) आहेत. पदवीपूर्व पातळीसाठी फक्त टायपिंग टेस्ट लागू होऊ शकते.

RRB NTPC CBT 1:

ही एक स्क्रीनिंग टेस्ट आहे. यामध्ये मिळालेले गुण अंतिम गुणवत्ता यादीत जोडले जात नाहीत. या स्तरावर वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न (MCQ) विचारले जातील. या प्रश्नांची काठिण्य पातळी इयत्ता १०वी आणि १२वीच्या अभ्यासक्रमाइतकी आहे.

कोणत्या विषयातून किती प्रश्न विचारले जातील?

सामान्य ज्ञान: ४० प्रश्न, ४० गुण

गणित: ३० प्रश्न, ३० गुण

सामान्य बुद्धिमत्ता आणि तर्क: ३० प्रश्न, ३० गुण

एकूण: १०० प्रश्न, १०० गुण

कालावधी: ९० मिनिटे (दिव्यांग उमेदवारांसाठी १२० मिनिटे).

मार्किंग स्कीम:

प्रत्येक बरोबर उत्तरासाठी: +१ गुण.

प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी: १/३ गुणांचे नकारात्मक गुण.

अनुत्तरित प्रश्नांसाठी: गुण कपात नाही.

सामान्यीकरण: गुणांचे सामान्यीकरण लागू आहे.

शॉर्टलिस्टिंग: CBT 2 च्या सामान्यीकृत गुणांच्या आधारे, उमेदवारांना टायपिंग स्किल टेस्ट किंवा कागदपत्र पडताळणीसाठी शॉर्टलिस्ट केले जाते.

आरआरबी एनटीपीसी टायपिंग स्किल टेस्ट (टीएसटी):

ज्युनियर क्लर्क कम टायपिस्ट, अकाउंट्स क्लर्क कम टायपिस्ट, ज्युनियर टाइम कीपर, ट्रेन्स क्लर्क इत्यादी पदांसाठी टायपिंग स्किल टेस्ट उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. हे फक्त पात्रता उद्देशाने आहे. त्याचे गुण गुणवत्ता यादीत समाविष्ट नाहीत.

आवश्यक टायपिंग स्पीड:

इंग्रजीमध्ये: ३० शब्द प्रति मिनिट (WPM²).

हिंदीमध्ये: २५ शब्द प्रति मिनिट (WPM²).

उपकरण: एडिटिंग टूल्स किंवा स्पेल-चेकशिवाय पर्सनल कंप्यूटर किंवा लॅपटॉप.

शॉर्टलिस्टिंग: प्रत्येक श्रेणीतील रिक्त पदांच्या संख्येच्या ८ पट टायपिंग चाचणीसाठी बोलावले जाते. ४०% पेक्षा जास्त कायमचे अपंगत्व (अंधत्व/कमी दृष्टी, सेरेब्रल पाल्सी, लोकोमोटर अपंगत्व) असलेल्या उमेदवारांना सक्षम वैद्यकीय मंडळाकडून सूट प्रमाणपत्र सादर केल्यास त्यांना टायपिंग चाचणीतून सूट मिळू शकते.

मार्किंग स्कीम:

मार्किंग नाही, फक्त पास/नापासवर आधारित.

आरआरबी एनटीपीसी कागदपत्र पडताळणी आणि वैद्यकीय तपासणी

**कागदपत्र पडताळणी:** रिक्त पदांच्या संख्येइतके उमेदवार सीबीटी २ (टायपिंग टेस्ट, लागू असल्यास) मधील कामगिरीच्या आधारावर बोलावले जातात. अतिरिक्त ५०% उमेदवारांना देखील बोलावले जाऊ शकते.

वैद्यकीय तपासणी: उमेदवारांनी रेल्वे प्रशासनाने निर्धारित केलेल्या शारीरिक आणि दृश्य तीक्ष्णता मानकांची पूर्तता केली पाहिजे.अंतिम गुणवत्ता: CBT 2 आणि टायपिंग टेस्ट (पास/फेल) च्या सामान्यीकृत गुणांच्या आधारे तयार केलेले. जर दोन उमेदवारांना समान गुण असतील तर मोठ्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाते.

उपयुक्त माहिती :भाषेचे पर्याय: ही परीक्षा १५ भाषांमध्ये घेतली जाते, ज्यामध्ये हिंदी, इंग्रजी, आसामी, बंगाली, गुजराती, कन्नड, मल्याळम, मराठी, ओडिया, पंजाबी, तमिळ, तेलगू, उर्दू इत्यादींचा समावेश आहे.सामान्यीकरण: आरआरबी एनटीपीसी परीक्षा अनेक शिफ्टमध्ये घेतली जाते, सामान्यीकरण प्रक्रियेद्वारे प्रत्येक शिफ्टच्या काठिण्य पातळीमध्ये निष्पक्षता सुनिश्चित करण्यासाठी गुण समायोजित केले जातात.परीक्षेच्या तारखा: पदवीपूर्व स्तरासाठी सीबीटी १ च्या तारखा अद्याप जाहीर केलेल्या नाहीत, परंतु पदवीपूर्व स्तराची परीक्षा ५ ते २४ जून २०२५ दरम्यान घेतली जाईल.रिक्त पदे: एकूण ११,५५८ रिक्त जागा आहेत, त्यापैकी ३,४४५ रिक्त जागा पदवीपूर्व स्तरासाठी (स्तर २ आणि ३) आहेत.

# कशा प्रकारे होते RAW मध्ये भरती?

ही यंत्रणा विदेशी सुरक्षा हालचालींवर नियंत्रण ठेवते.RAW च्या नियंत्रणाखाली असणाऱ्या सगळ्या मोहिमा अगदी गुप्त स्वरूपात असतात. RAW मध्ये करण्यात येणारे प्रत्येक कार्य अगदी गुप्त असते. महत्वाचे म्हणजे RAW मध्ये एजेंट पदी नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांची भरती ही अगदी गुपित पद्धतीने केली जाते. मुळात,RAW च्या भरतीसाठी कोणत्याही संकेतस्थळावर जाऊन अर्जाचा फॉर्म भरण्याची गरज नसते. मुळात, ही भरती साधारण तरुणांसाठी नसतेच. या भरतीमध्ये नियुक्तसाठी विविध निकष पात्र करावे लागतात. हे निकष अतिशय कठीण आहेत, कारण याला पात्र शक्यतो एखादा सरकारी अधिकारीच करतो.



RAW जास्तीत जास्त IAS, IPS तसेच भारतीय सैन्यात असणाऱ्या अधिकाऱ्यांना भरती कारण्यात्त भर देतो. आधीपासून देशाच्या केंद्रीय व्यवस्थेत रुजू असणारे अनुभवी अधिकारी RAW चे भाग बनतात. तर बहुतेकवेळा णझडउ क्रॅक करणारे उमेदवारांना खइ किंवा इतर व्यवस्थेच्या माध्यमातून RAW मध्ये भरती केली जाते. मुळात, ही प्रक्रिया देखील अतिशय गुप्त पद्धतीने आयोजली जाते. तसेच भारतीय सैन्यातील अनुभवी अधिकाऱ्यांनादेखील RAW मध्ये भरती केली जाते.

या भरतीच्या माध्यमातून नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांना RAW ची ट्रेनिंग दिली जाते आणि नंतर एका गुप्त मोहिमेवर पाठवण्यात येतं. या ट्रेनिंगमध्ये हत्यार चालवण्याचे प्रशिक्षण, भाषा तसेच संवादाचे कौशल्य, शारीरिक स्वास्थ्य तसेच मनावर नियंत्रण ठेवण्याचे प्रशिक्षण दिले जाते. त्याचबरोबर सायबर सिक्योरिटीबद्दल शिकवले जाते.

RAW ची भरती प्रक्रिया इतकी कणखर असते की ज्या अधिकाऱ्याची निवड केली जाते, त्या अधिकाऱ्याच्या घराची, कुटुंबाशी, मित्रांशी तर फक्त इतकेच नव्हे तर त्या अधिकाऱ्याच्या मढविद्यालयीन प्राचार्यांशी देखील त्या अधिकार्यांच्या संपूर्ण चरित्राबद्दल चर्चा केली जाते.त्या अधिकारीमध्ये खरंच देश प्रेम आहे का? या सर्व बाबी तपासल्या जातात, मगच त्या अधिकाऱ्याला RAW मध्ये एजेंट म्हणून घेण्याचा निर्णय घेतला जातो.

# तुम्हाला पर्यटन आणि आतिथ्य क्षेत्रात करिअर करायचे आहे?

मुंबईतील विनायक गणेश वझे महाविद्यालयात पर्यटन आणि आतिथ्य क्षेत्रातील करिअरसाठी 'बॅचलर ऑफ व्होकेशन' अभ्यासक्रम उपलब्ध आहे. मुंबई विद्यापीठाशी संलग्नित या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना पर्यटन उद्योगासाठी आवश्यक कौशल्ये शिकवली जातात. या कोर्समुळे विद्यार्थ्यांना इंटर्नशिप आणि कॅम्पस प्लेसमेंटची संधी मिळते, ज्यामध्ये १०० टक्के प्लेसमेंटचा विक्रम आहे. विद्यार्थ्यांना उद्योजक बनण्यासही प्रोत्साहन दिले जाते. अधिक माहितीसाठी महाविद्यालयाच्या संकेतस्थळाला भेट द्या.पर्यटन आणि आतिथ्य या क्षेत्रात करिअर घडवण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी केळकर एज्युकेशन ट्रस्टच्या विनायक गणेश वझे महाविद्यालयात (स्वायत्त) तीन वर्षांचा बॅचलर ऑफ व्होकेशन (बी. व्होक) अभ्यासक्रम उपलब्ध आहे. मुंबई विद्यापीठाशी संलग्न आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कौशल्य विकास योजनेंतर्गत राबवण्यात येणाऱ्या या अभ्यासक्रमाची सुरुवात २०१८ मध्ये झाली होती.

या अभ्यासक्रमात पर्यटन आणि आतिथ्य उद्योगात काम करण्यासाठी आवश्यक कौशल्यांवर भर दिला जातो. १२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना एफवाय बी. व्होकमध्ये प्रवेश घेता येतो. तिसऱ्या वर्षाच्या अखेरीस अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्यांना सशुल्क इंटर्नशिप आणि कॅम्पस प्लेसमेंटसाठी संधी मिळते. आतापर्यंत या अभ्यासक्रमाने १०० टक्के प्लेसमेंटचा विक्रम नोंदवला आहे.

विद्यार्थ्यांना केवळ नोकरीसाठी सज्ज करणेच नव्हे, तर उद्योजक बनण्यासाठीही प्रशिक्षित करणे, हा या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश आहे. पर्यटन, आतिथ्य आणि एअरलाइन क्षेत्रातील विशिष्ट नोकरीच्या भूमिका लक्षात घेऊन अभ्यासक्रम आखण्यात आला आहे. मार्केटिंग, मानव संसाधन व्यवस्थापन, पर्यटनाचा इतिहास, भाषा अभ्यास, विमानतळ कोड्स आणि अमेडियस प्रशिक्षण यांचा यात समावेश आहे.

पर्यटन व्यवसायाशी निगडित कंपन्या व संस्था, तसेच विमान कंपन्यांमध्ये काम करण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरू शकतो. विद्यार्थ्यांच्या कौशल्यांचा विकास करून त्यांना रोजगारक्षम बनवणे आणि त्यांच्या करिअरमध्ये प्रगतीची दिशा देणे, हे या अभ्यासक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. या अभ्यासक्रमाच्या माहितीसाठी व प्रवेशासाठी संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन महाविद्यालयाने केले आहे.

मुंबईतील विनायक गणेश वझे महाविद्यालयात पर्यटन आणि आतिथ्य क्षेत्रातील नोकरीसाठी 'बी. व्होक' अभ्यासक्रम सुरू आहे. बारावी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. या कोर्समध्ये विद्यार्थ्यांना इंटर्नशिप आणि कॅम्पस प्लेसमेंटची संधी मिळते. शंभर टक्के प्लेसमेंटचा महाविद्यालयाचा विक्रम आहे. विद्यार्थ्यांना उद्योजक बनण्यासही मार्गदर्शन केले जाते. महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर अधिक माहिती उपलब्ध आहे.

# शासनाने लाँच केले 'सुपर १००', मेडिकल आणि IIT विद्यार्थ्यांसाठी मोफत कोचिंग

उत्तराखंड सरकारने 'सुपर १००' कार्यक्रम सुरू केला. हा कार्यक्रम वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांसाठी आहे. १०० विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण असून जेवण, निवास आणि अभ्यास साहित्यदेखील मोफत मिळेल

उत्तराखंड सरकारने 'सुपर १००' नावाची एक नवीन योजना सुरू केली आहे. या योजनेचे उद्घाटन नुकतेच शिक्षण मंत्री डॉ. धनसिंग रावत यांनी केले, ज्या अंतर्गत डॉक्टर किंवा अभियंता बनू इच्छिणाऱ्या आणि छएएढ किंवा गएए सारख्या स्पर्धात्मक प्रवेश परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. 'सुपर १००' योजना बारावीच्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी आहे, ज्या अंतर्गत सरकार १०० मुलांना मोफत प्रशिक्षण देईल. 'समग्र शिक्षा अभियान' अंतर्गत ही योजना सुरू करण्यात आली आहे.

'सुपर १००' योजना काय आहे?

परीक्षेच्या आधारे, मोफत प्रशिक्षणासाठी पात्र असलेल्या राज्यातील १०० होनहार विद्यार्थ्यांची निवड केली जाईल, जे 'सुपर १००' कार्यक्रमाचा भाग बनतील. मंत्री म्हणाले की हा कार्यक्रम १ जून ते १५ जुलै दरम्यान देहरादूनमध्ये चालेल. निवडलेल्या विद्यार्थ्यांना मोफत जेवण, निवास, अभ्यास साहित्य आणि प्रशिक्षणासाठी शिक्षकांसह सर्व सुविधा मिळतील.

झढख च्या वृत्तानुसार, अवंती नावाच्या संस्थेच्या मदतीने हा कार्यक्रम सुरू केला जात आहे. राज्य प्रकल्प संचालक कुलदीप गायरोला यांच्या मते, ४५ दिवसांच्या वर्गानंतर, हे विद्यार्थी त्यांच्या शाळांमध्ये परत जातील आणि नंतर वर्षभर त्यांना ऑनलाइन प्रशिक्षण मिळत राहील. विद्यार्थ्यांचा अभ्यास कसा चालला आहे हे पाहण्यासाठी वेळोवेळी चाचण्या घेतल्या जातील असेही त्यांनी सांगितले.

दिल्ली सरकारचादेखील उपक्रम

या वर्षी मार्चमध्ये, दिल्ली सरकारने असाच एक उपक्रम हाती घेतला होता, जिथे सरकारने BIG इन्स्टिट्यूट आणि फिजिक्स वाला लिमिटेड सोबत करार केला होता, त्यानुसार दिल्ली सरकारी शाळांमधील १.६३ लाख विद्यार्थ्यांना NEET UG आणि CUET UG परीक्षांसाठी क्रॅश कोर्सच्या स्वरूपात मोफत कोचिंग दिले जाईल.

१ जून ते १५ जुलै या कालावधीत डेहराडूनमध्ये एकूण ४५ दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात निवडलेल्या विद्यार्थ्यांना सर्व सुविधा मोफत पुरवल्या जातील, ज्यामध्ये जेवण, निवास, अभ्यास साहित्य आणि प्रशिक्षणासाठी शिक्षकांचा समावेश आहे.

या कार्यक्रमात अवंती फेलो संस्थेचे सहकार्यही घेतले जात असल्याचे मंत्र्यांनी सांगितले. समग्र शिक्षाचे अतिरिक्त राज्य प्रकल्प संचालक कुलदीप गायरोला म्हणाले की, ४५ दिवसांच्या ऑफलाइन अभ्यासानंतर हे विद्यार्थी त्यांच्या शाळेत परततील आणि त्यानंतर त्यांना संपूर्ण वर्षभर ऑनलाइन प्रशिक्षण दिले जाईल. ते म्हणाले की, प्रशिक्षणादरम्यान, विद्यार्थ्यांचे सतत मूल्यांकन केले जाईल जेणेकरून ते स्पर्धा परीक्षांची तयारी चांगल्या प्रकारे करू शकतील.

# AAICLAS ने ३९३ पदांसाठी जाहीर केली भरती

**९ जूनपासून करा अर्ज**

भारतीय विमानतळ प्राधिकरणाची उपकंपनी असलेल्या AAICLAS ने भरती जाहीर केली आहे. एकूण ३९३ पदांसाठी पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन पद्धतीने दिनांक ३० जून २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागवित आहे.

भारतीय विमानतळ प्राधिकरणाची उपकंपनी असलेल्या AAI कार्गो लॉजिस्टिक्स अँड अलाइड सर्व्हिसेस कंपनी लिमिटेड (AAICLAS) ने भरती जाहीर केली आहे. सिक्युरिटी स्क्रीनर फ्रेशर आणि असिस्टंट सिक्युरिटी या पदांसाठी ही भरती जाहीर करण्यात आली आहे. सिक्युरिटी स्क्रीनर फ्रेशरसाठी २२७ आणि असिस्टंट सिक्युरिटीसाठी १६६ रिक्त जागा जाहीर झाल्या आहेत.

९ जूनपासून यासाठी अर्ज करता येणार, अर्ज करण्याची अंतिम दिनांक ३० जून २०२५ आहे. अमृतसर, वडोदरा आणि चेन्नईसाठी सिक्युरिटी स्क्रीनर फ्रेशरची भरती केली जाणार आहे.

तर त्याचक्षणी पटना, विजयवाडा, वडोदरा पोर्ट ब्लेअर, चेन्नई आणि गोवासाठी असिस्टंट सिक्युरिटीची भरती करण्यात येणार आहे. ही भरती तीन वर्षाच्या करारावर करण्यात येणार आहे.



मुलाखतीला उपस्थित राहण्यासाठी लिंक्स पात्र उमेदवारांना त्यांच्या ईमेल आयडीवर पाठवल्या जातील. सिक्युरिटी स्क्रीनर फ्रेशरसाठी किमान ग्रॅज्युएशन पात्रता आवश्यक आहे. कमाल वयोमर्यादा २७ वर्षे असेल. असिस्टंट सिक्युरिटीसाठी पात्रता १२ वी उत्तीर्ण आवश्यक आहे.

आरआरबी एनटीपीसी (RRB NTPC) पदवीपूर्व स्तरावरील परीक्षा ५ जून ते २४ जून २०२५ दरम्यान होणार आहे. रेल्वे भरती मंडळाने आरआरबी एनटीपीसी प्रवेशपत्र २०२५ जारी केले आहे.

आरआरबी एनटीपीसी प्रवेशपत्र २०२५ हे ीललवस.सीं.ळप किंवा इतर प्रादेशिक आरआरबी वेबसाइटवरून डाउनलोड करता येते. आरआरबी एनटीपीसी परीक्षा २०२५ पूर्वी, त्याचा एग्जाम पैटर्न आणि मार्किंग स्कीम समजून घेणे खूप महत्वाचे आहे.

रेल्वे रिक्रूटमेंट बोर्ड RRB NTPC (नॉन-टेक्निकल पॉप्युलर कॅटेगरी) अंडरग्रेजुएट लेव्हल (लेव्हल २ आणि ३) परीक्षा उत्तीर्ण होऊन तुम्ही सरकारी नोकरी मिळवू शकता. RRB NTPC ॲडमिट कार्ड २०२५ डाउनलोड करण्यासाठी नोंदणी क्रमांक आणि जन्मतारीख आवश्यक असेल.

RRB हॉल तिकिटावर परीक्षेची तारीख, वेळ, परीक्षा केंद्राचा पत्ता आणि महत्त्वाच्या सूचना असतात. RRB ने उमेदवारांना ॲडमिट कार्डची प्रिंटआउट घेऊन वेळेवर परीक्षा केंद्रावर पोहोचण्याचा सल्ला दिला आहे.

# १५ हजार हाय-टेक नोकऱ्यांची निर्मिती शक्य-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ने वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) येथील तीन अत्यंत महत्त्वाच्या व्यावसायिक भूखंडांचे वाटपपत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांना आज प्रदान करण्यात आले. या भूखंडांच्या भाडेपट्ट्यातून एमएमआरडीएला ३ हजार ८४० कोटी ४९ लाख रुपये मिळाले आहेत. यामुळे १५ हजार हाय-टेक नोकऱ्यांची निर्मिती शक्य होणार आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख हस्ते सुमिटोमो रिलिटी अँड डेव्हलपमेंट लि. या जपानी कंपनीला दोन भूखंडाचे आणि ब्रूकफिल्ड स्ट्रॅटेजिक रिअल इस्टेट या कंपनीला एक भूखंडाचे वाटपपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, एमएमआरडीएचे आयुक्त डॉ.संजय मुखर्जी तसेच जपानचे शिष्टमंडळ आदी उपस्थित होते.

मुंबई बीकेसी येथील सी-१३ आणि सी-१९ या दोन्ही भूखंडांसाठी गोईसू रिलिटी प्रा.लि. (सुमिटोमो रिलिटी अँड डेव्हलपमेंट लि., जपानची भारतीय उपकंपनी) ने सर्वोच्च बोली लावली होती. तसेच सी-८० या भूखंडास स्क्लोस बंगलोर लि. (ब्रूकफिल्ड स्ट्रॅटेजिक रिअल इस्टेट पार्टनर्स ३ ची भारतीय उपकंपनी), अर्लींगा इको स्पेस बिझीनेस पार्क व स्क्लोस चाणक्य प्रा. लि. यांच्या संयुक्त भागीदारीने सर्वोच्च बोली लावली होती.

प्लॉट सी-१३ या भूखंडाचे ७,०७१.९० वर्ग मीटर क्षेत्रफळ असून ९७४.५१ आरक्षित किंमत होती. लिलावामध्ये या प्लॉटच्या बोलीत १,३६०.४८ किंमत मिळाली. प्लॉट सी-१९ या भूखंडाचे ६,०९६.६७ वर्ग मीटर क्षेत्रफळ असून ८४०.१२ ही आरक्षित किंमत होती. लिलावमध्ये या प्लॉटला १,१७७.८६ रक्कम मिळाली. तसेच, सी-८० या भूखंडाचे क्षेत्रफळ ८,४११.८८ असून आरक्षित किंमत १,१५९.१६ होती. लिलावामध्ये या प्लॉटला १,३०२.१६ रुपये बोली मिळाली.

या तीन भूखंडांच्या भाडेपट्ट्यामुळे एमएमआरडीएला एकूण ३,८४०.४९ कोटींचे उत्पन्न प्राप्त झाले असून, जवळपास १५ हजार हाय-टेक नोकऱ्यांची निर्मिती होण्याची अपेक्षा आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या (डब्ल्यूईएफ) ५५व्या वार्षिक बैठकीत दरम्यान एमएमआरडीएने सुमिटोमो व ब्रूकफिल्ड या कंपन्यांसोबत अनुक्रमे युएसडी ५ अब्ज व युएसडी १२ अब्ज गुंतवणुकीच्या करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.ही विकासकामे एमएमआरडीएच्या ग्रोथ हब स्ट्रॅटेजी व नीती आयोगाच्या जी - हब उपक्रमांखालील सक्रिय गुंतवणूक प्रोत्साहनाचा भाग आहेत. मुंबई महानगर प्रदेशात २०३० पर्यंत युएसडी ३०० अब्ज अर्थव्यवस्था व ३० लाख रोजगार निर्माण करण्याचे लक्ष्य आहे. त्याचबरोबर, अत्याधुनिक पायाभूत सुविधा, भूमिगत मेट्रो, एलिवेटेड मेट्रो व बुलेट ट्रेनच्या जाळ्यामुळे बीकेसी लवकरच नंबर वन व्यावसायिक केंद्र होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

## Flipkart मध्ये भरती

ई-कॉमर्स कंपनी, फ्लिपकार्टमध्ये रिक्त जागा जाहीर केल्या आहेत. ही रिक्त जागा प्रशिक्षक म्हणजेच ट्रेनरसाठी जाहीर केली आहे.

ई-कॉमर्स कंपनी, फ्लिपकार्टमध्ये रिक्त जागा जाहीर केल्या आहेत. ही रिक्त जागा प्रशिक्षक म्हणजेच ट्रेनरसाठी जाहीर केली आहे. या पदासाठी निवडलेल्या अमेदवाराला व्हिडीओ ट्रेनिंग, नवीन नियुक्त्यांचे प्रशिक्षण, जगढ मैनेजमेंट इत्यादींची जबादारी असेल.

पात्रता:या पदासाठी अर्ज करणारे उमेदवार पदवीधर म्हणजेच ग्रॅज्युएट असावेत.तसेच अनुभव:१ ते २ वर्षांचा कामाचा अनुभव असावा.

आवश्यक कौशल्ये:

चांगले संवाद कौशल्य.

कंटेंट डिलिव्हरी कौशल्य.

नवीन कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण.

ऑन फ्लोअर ट्रेनिंग ओजेटी.

वेतन:-वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी नोकरीचे पगार देणारी वेबसाइट एम्बिशनबॉक्सच्या मते, फ्लिपकार्टमधील व्हिडिओ ट्रेनरचा सरासरी वार्षिक पगार ४ लाख रुपयांपर्यंत असू शकतो.

अर्ज करण्यासाठी थेट लिंक:

खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करून तुम्ही या पदासाठी अर्ज करू शकता.

## पदवीधर आणि इंजिनिअर्ससाठी नौकरीची सुवर्णसंधी

### 'इथे' मिळतेय १६ लाख पॅकेजची नोकरी

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने अनेक पदांसाठी भरती जाहीर केली आहे. उमेदवार अधिकृत वेबसाइटला भेट देऊन त्यासाठी अर्ज करू शकतात. गलेगठ्ठ पगाराची ही नोकरी कशी मिळवाल जाणून भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (BPCL) मध्ये नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांसाठी एक उत्तम संधी आली आहे. कंपनीने ज्युनियर एक्झिक्युटिव्ह आणि असोसिएट एक्झिक्युटिव्हसह अनेक पदांसाठी भरती जाहीर केली आहे.

या भरतीतील खास गोष्ट म्हणजे विविध क्षेत्रात शिक्षण घेतलेले उमेदवार या पदांसाठी अर्ज करू शकतात. इच्छुक उमेदवार BPCL bharatpetroleum.in च्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊन ऑनलाइन अर्ज करू शकतात. सध्या अनेकांना नक्की कुठे नोकरी करायची आणि कसा अर्ज करायचा याबाबत माहिती करून देण्यासाठी आपण हा लेख लिहिला आहे

**कोण अर्ज करू शकते?**

-ज्युनियर एक्झिक्युटिव्ह (अभियांत्रिकी): मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इन्स्ट्रुमेंटेशन, इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हिल किंवा केमिकल इंजिनिअरिंगमध्ये डिप्लोमा केलेले उमेदवार या पदासाठी अर्ज करू शकतात

-असोसिएट एक्झिक्युटिव्ह (अभियांत्रिकी): बी.टेक, बीई किंवा बीएससी (अभियांत्रिकी) करणारे तरुण या पदासाठी पात्र आहेत

-ज्युनियर एक्झिक्युटिव्ह (अकाउंट्स): पदवीसह इंटर सीए किंवा इंटर सीएमए आवश्यक आहे

-असोसिएट एक्झिक्युटिव्ह (गुणवत्ता हमी): एमएससी (रसायनशास्त्र) मध्ये पदवी असणे आवश्यक आहे, ते देखील सेंद्रिय, अजैविक, भौतिक किंवा विश्लेषणात्मक रसायनशास्त्रात

सचिव: दहावी आणि बारावी उत्तीर्ण होण्यासोबतच पदवी देखील आवश्यक आहे.

सरकारी नोकरी: हिंदुस्तान कॉपर लिमिटेडमध्ये २०९ पदांसाठी भरती; १० वी पास विध्यार्थी करू शकतात अर्ज

वय- या पदांसाठी किमान वय ३० वर्षे आणि कमाल वय ३५ वर्षे आहे. तथापि, ओबीसी, एससी/एसटी उमेदवारांना सरकारी नियमांनुसार वयात सूट दिली जाईल असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे तुम्ही जर या वयोगटामध्ये व्यवस्थित फिट असाल तर त्वरीत या भरघोस पगाराच्या नोकरीसाठी तुम्ही अर्ज करू शकता. यासाठी नक्की किती पगार असेल याबाबत आपण अधिक माहिती घेऊया

किती पगार दिला जाईल?

ज्युनियर एक्झिक्युटिव्हसाठी मासिक वेतन ३०,००० ते १,२०,००० आहे (वार्षिक पॅकेज अंदाजे ११.८६ लाख)

असोसिएट एक्झिक्युटिव्ह: मासिक ४०,००० ते १,४०,००० (वार्षिक पॅकेज अंदाजे १६.६४ लाख)

निवड कशी केली जाईल?

सर्वप्रथम, पात्रता आणि अनुभवाच्या आधारे शॉर्टलिस्टिंग केले जाईल. त्यानंतर लेखी परीक्षा घेतली जाईल. त्यानंतर केस-आधारित चर्चा, गट कार्य आणि मुलाखतीद्वारे अंतिम निवड केली जाईल. ही निवड संपूर्णतः भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन यांच्याद्वारेच असणार आहे. यासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही. मात्र अर्ज करण्यासाठी शुल्क असेल

**फिस-** सामान्य, ओबीसी, ईडब्ल्यूएस श्रेणीसाठी: १००० + १८० (जीएसटी). एससी, एसटी, अपंगासाठी कोणतेही शुल्क नाही.

**अर्ज कसा करायचा?**

BPCL ची वेबसाइट bharatpetroleum.in ला भेट द्या

होमपेजवर दिलेल्या BPCL भरती २०२५ लिंकवर क्लिक करा

अर्ज फॉर्म भरा आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करा

शुल्क भरा आणि फॉर्म सबमिट करा

भविष्यातील संदर्भासाठी फॉर्मची प्रिंटआउट घ्या

कोणत्याही पद्धतीने तुम्ही अर्ज करताना चुकू नका. इथे आम्ही या लेखातून तुम्हाला योग्य आणि स्टेप बाय स्टेप माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. या पद्धतीने अर्ज करून तुम्ही तुमच्या भविष्यासाठी तरतूद करण्यासाठी पहिले पाऊल उचलू शकता. मोठ्या पगाराची नोकरी तुम्हीही मिळवू शकता. या लेखात उल्लेख केल्याप्रमाणे तुम्ही जर सर्व बाबतीत व्यवस्थित फिट असाल तर त्वरीत अर्ज करायला घ्या!

# नीट आणि पीजी १५ जूनला होणारी परीक्षा रद्द

वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीची नीट पीजी परीक्षा एकाच टप्प्यात घेण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने संबंधित विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. या निर्णयामुळे ही परीक्षा पारदर्शीपणे होईल, अशी भावना या विद्यार्थ्यांची




आहे. राष्ट्रीय परीक्षा मंडळाने (एनईबी) ही परीक्षा दोन टप्प्यात १५ जून रोजी घेण्याचे निश्चित केले होते. मात्र या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्यात आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने ही परीक्षा एकाच टप्प्यात घेण्याचे आदेश एनईबीला दिले. त्यावर एकाच टप्प्यात परीक्षा होणे अधिक नि:पक्ष असल्याची प्रतिक्रिया निवासी डॉक्टरांची संघटना मार्डने दिली आहे.

नवी तारीख कधी जाहीर होणार?

नागपुरात या अभ्यासक्रमाच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (मेडिकल) २७६, तर इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (मेयो) १४७ अशा जागा आहेत. एकाच टप्प्यात ही परीक्षा घ्यायची असल्याने केंद्रांची संख्या वाढवावी लागणार आहे. त्याच्या तयारीसाठी लागणारा वेळ लक्षात घेता एनईबीने आता १५ जून ही तारीख रद्द केली असून, लवकरच या परीक्षेची नवीन तारीख जाहीर करण्यात येणार आहे. आता ही परीक्षा ३ ऑगस्टला होण्याची शक्यता आहे. कारण जवळची तारीख तीच आहे. पण अजून अधिकृतपणे राष्ट्रीय परीक्षा मंडळाने तारीख जाहीर केली नाही. ही नवी तारीख अधिकृतरित्या लवकरच जाहीर होणार आहे.

एमबीबीएस वैद्यकीय पदवीधारकांना एमडी, एमएस आणि पीजी डिप्लोमासारख्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश देण्यासाठी ही परीक्षा घेतली जाते. देशभरात या परीक्षेसाठी अडीच लाखांहून अधिक पदवीधारकांनी अर्ज केले आहेत.

वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठीची 'नीट-पीजी' परीक्षा एकाच टप्प्यात घ्यावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी राष्ट्रीय परीक्षा मंडळाला (एनबीई) दिले. दोन टप्प्यांत परीक्षा घेतल्यास मनमानीला वाव मिळतो, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने येत्या १५ जून रोजी होणारी 'नीट-पीजी' एकाच टप्प्यात घेण्यासाठी व्यवस्था करावी, अशी सूचना 'एनबीई'ला केली होती.

'एमबीबीएस' वैद्यकीय पदवीधारकांना एमडी, एमएस आणि पीजी डिप्लोमासारख्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश देण्यासाठी ही परीक्षा घेतली जाते. 'नीट-पीजी २०२५' परीक्षा दोन टप्प्यांमध्ये घेण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या 'युनायटेड डॉक्टर्स फ्रंट'च्या याचिकांवर शुक्रवारी न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्या. संजय कुमार आणि न्या. एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने सुनावणी घेतली. यंदा 'नीट-पीजी'साठी अडीच लाखांहून अधिक वैद्यकीय पदवीधारकांनी अर्ज केल्याचे 'एनबीई'ने न्यायालयात सांगितले.

# साधना नायर बनल्या मेडिकल सर्व्हिसेसच्या पहिल्या महिला डीजी

भारतीय लष्करातील महिलांची वाटचाल दिवसेंदिवस भक्कम होत आहे. अलीकडेच NDA (नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी) च्या १४८व्या पासिंग आऊट परेडमध्ये पहिल्या महिला बॅचने यशस्वीपणे प्रशिक्षण पूर्ण केले आणि देशाला १७ नव्या महिला अधिकारी मिळाल्या. परंतु या ऐतिहासिक प्रगतीच्या मार्गावर एक अत्यंत महत्त्वाचं नाव कायमच अधोरेखित केलं जातं ते म्हणजे लेफ्टिनेंट जनरल साधना सक्सेना नायर. या खंबीर आणि प्रेरणादायी महिलेला भारताच्या पहिल्या महिला मेडिकल सर्व्हिसेसच्या डीजी (आर्मी) होण्याचा मान प्राप्त झाला आहे.दरम्यान लेफ्टिनेंट जनरल साधना सक्सेना नायर नक्की कोण आहेत? त्यांचं शिक्षण आणि लष्करात महत्त्वपूर्ण योगदान, जाणून घेऊया.



लेफ्टिनेंट जनरल नायर यांचा जन्म १९६४ साली दिल्ली येथे झाला. त्यांचे वडील एअर कमोडोर विनोद कुमार सक्सेना हे भारतीय हवाई दलात वरिष्ठ अधिकारी होते, तर आई मनोरमा सक्सेना यांनी त्यांचे मार्गदर्शन केले. त्यांचे शिक्षण प्रयागराजमधील सेंट मेरी कॉन्व्हेंट आणि नंतर लखनऊमधील लोरेटो कॉन्व्हेंटमध्ये झाले.पुढे त्यांनी पुणे येथील सशस्त्र बल वैद्यकीय महाविद्यालय (AFMC) येथून डिस्टिंक्शनसह वैद्यकीय पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी फॅमिली मेडिसिनमध्ये पदव्युत्तर शिक्षण, तसेच मातृ व बाल आरोग्य आणि हेल्थ केअर या विषयांत डिप्लोमा घेतला. याशिवाय,AIIMS दिल्ली येथून त्यांनी मेडिकल इन्फॉर्मेटिक्समध्ये दोन वर्षांचं विशेष प्रशिक्षण घेतलं आहे.

त्यांची लष्करी सेवा डिसेंबर १९८५ मध्ये भारतीय लष्कराच्या मेडिकल कोरमध्ये कमीशन घेऊन सुरू झाली. त्यांनी अनेक वर्षे भारतीय हवाई दलाच्या पश्चिमी आणि प्रशिक्षण कमान यामध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा बजावली. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी वैद्यकीय व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि सशस्त्र दलांतील जवानांचे आरोग्य सुधारण्यावर विशेष लक्ष दिलं. डीजी मेडिकल सर्व्हिसेस (आर्मी) पदावर नेमणूक होण्यापूर्वी त्या डायरेक्टर जनरल हॉस्पिटल सर्व्हिसेस (सशस्त्र बल) म्हणून कार्यरत होत्या, जिथे त्यांच्या कार्यकाळात आर्म्ड फोर्सेसच्या सर्व शाखांमधील वैद्यकीय सेवा सुधारण्याचे नेतृत्व त्यांनी केलं.

लेफ्टिनेंट जनरल नायर केवळ वैद्यकीय सेवांपुरतीच मर्यादित नाहीत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020) च्या मसुदा समितीत त्या तज्ज्ञ सदस्य म्हणून सहभागी होत्या. डॉ. कस्तुरीरंगन समितीने तयार केलेल्या या धोरणात वैद्यकीय शिक्षणातील सुधारणा आणि नव्या संकल्पनांचा समावेश करण्यात त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.सध्या डीजी मेडिकल सर्व्हिस आर्मी या पदावर कार्यरत असलेल्या लेफ्टिनेंट जनरल नायर यांचं मुख्य उद्दिष्ट आहे भारतीय लष्कराच्या जवानांना उत्कृष्ट वैद्यकीय सुविधा देणं. त्यांचा दृष्टीकोन आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचा समावेश करून सैन्याच्या मानसिक आरोग्य सेवांमध्ये सुधारणा घडवून आणणं हा आहे. त्यांच्या नेतृत्त्वाखाली भारतीय लष्करात मानसिक आरोग्यावर अधिक भर दिला जात आहे, जे अत्यंत गरजेचं आणि भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाचं पाऊल ठरत आहे.

लेफ्टिनेंट जनरल साधना सक्सेना नायर केवळ भारतातीलच नव्हे तर संपूर्ण जागतिक लष्करी व्यवस्थेत महिलांच्या नेतृत्त्वाचे प्रेरणास्थान ठरल्या आहेत. त्यांनी पुरुषप्रधान लष्करी व्यवस्थेत स्वतःची जागा केवळ निर्माणच केली नाही, तर त्यात प्रगतीचे नवे मापदंडही प्रस्थापित केले. अशा धाडसी, दूरदर्शी आणि सेवाभावी अधिकारीचा आदर्श उभारून देशभरातील महिला अधिकारी आणि विद्यार्थिनींसाठी त्या एक प्रकाशस्तंभ ठरत आहेत.

# पीसीएम आणि पीसीबी गटाच्या एमएचटी सीईटी परीक्षेत २८ सत्रांमधील ४० प्रश्न चुकीचे

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी कक्ष) घेतलेल्या पीसीएम आणि पीसीबी गटाच्या एमएचटी सीईटी परीक्षेत २८ सत्रांमधील ४० प्रश्न चुकीचे असल्याचे समोर आले आहे. यात सर्वाधिक, म्हणजे २८ चुका गणिताच्या प्रश्नांमध्ये होत्या.

भौतिकशास्त्र विषयाचे सात, रसायनशास्त्राचे चार आणि जीवशास्त्राचा फक्त एकच प्रश्न चुकल्याचेही समोर आले आहे. प्रत्येक सत्रात चुकलेल्या प्रत्येक प्रश्नासाठी विद्यार्थ्यांना एक गुण मिळणार आहे. त्यानुसार २३ एप्रिलच्या संध्याकाळच्या आणि २५ एप्रिलच्या सकाळच्या सत्रात सर्वाधिक, म्हणजे चार गुण विद्यार्थ्यांना मिळतील.

सीईटी कक्षाने ९ ते १७ एप्रिल या कालावधीत भौतिक-रसायन-जीवशास्त्र (पीसीबी) गटासाठी आणि १९ ते २७एप्रिल या कालावधीत भौतिक-रसायन-गणित (पीसीएम) गटासाठी परीक्षा घेतली. यातील एका दिवशीच्या एका सत्रात काही तांत्रिक बिघाड आल्याने त्या सत्राची पुनर्परीक्षा ५ मे रोजी घेण्यात आली. या सर्व परीक्षा २८ सत्रांमध्ये घेण्यात आल्या.

अकरावी ऑनलाइन प्रक्रियेसाठी मुदतवाढ; आता 'या' तारखेपर्यंत करता येणार प्रवेश नोंदणी

पीसीबी गटातील परीक्षा दिलेल्या उमेदवारांना १८ मेपासून आणि पीसीएम गटासाठी २१ मेपासून सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावर आक्षेप नोंदवण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. त्यानुसार २९० विद्यार्थ्यांनी एक हजार ४१४ प्रश्नांवर आक्षेप नोंदविला होता. यामध्ये गणित विषयासाठी सर्वाधिक ८७२ आक्षेप नोंदविण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना सत्रनिहाय प्रत्येक चुकीसाठी एक गुण

सर्वाधिक २८ चुका गणिताच्या प्रश्नांमध्ये

२३ आणि २५ एप्रिलच्या सत्रांमध्ये सर्वाधिक चार चुका

जीवशास्त्र विषयात फक्त एकच चूक

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने घेतलेल्या एमएचटी सीईटी परीक्षेत २८ सत्रांमधील ४० प्रश्न चुकीचे आढळले आहेत. गणित विषयात सर्वाधिक २८ चुका आहेत, तर भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र विषयात अनुक्रमे सात, चार आणि एक चूक आहे. विद्यार्थ्यांना प्रत्येक चुकीच्या प्रश्नासाठी गुण मिळणार असून, २३ आणि २५ एप्रिलच्या सत्रांतील विद्यार्थ्यांना सर्वाधिक गुण मिळतील.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी कक्ष) सोमवारी एमएचटी-सीईटीसह इतर पाच अभ्यासक्रमांच्या निकालांच्या तात्पुरत्या तारखा जाहीर केल्या.

यानुसार एमएचटी-सीईटीच्या पीसीएम आणि पीसीबी या दोन्ही गटांच्या सीईटींचा निकाल सोमवार, १६ जून रोजी अपेक्षित आहे.

उर्वरित अभ्यासक्रमांचे निकाल ४ ते १७ जून या कालावधीत लागणे अपेक्षित आहे. सीईटी कक्षातर्फे घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षांसंदर्भातील काही परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. यानंतर, यातील महत्त्वाच्या एमएचटी-सीईटी परीक्षेच्या पीसीएम व पीसीबी गटाचा निकाल १६ जून रोजी जाहीर करण्यात येणार आहे.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2010/34125
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813